**सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करुन त्या रास्तभाव दुकानात पोहोच करण्यासाठीची व अन्नधान्य हाताळणूकीची कंत्राटे निश्चित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र: कंत्राट ११२४/प्र.क्र.७५/ना.पु.१६-अ**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक:- २४ एप्रिल, २०२६.

**वाचा:-**

१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिवाप-१०१०/प्र.क्र.१९८/नापु २८, दि.२३.०२.२०१२.

२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र.कंत्राट-१०१२/प्र.क्र.६०/नापु १६-अ, दि.२६.११.२०१२.

३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र.कंत्राट-१०१६/प्र.क्र.१६९/ना.पु.१६-अ, दि.२०.०४.२०१७.

४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१११६/प्र.क्र.४०/ना.पु.१६-अ, दि.२५.०४.२०१७.

५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र.कंत्राट-११२०/प्र.क्र.१०६/ना.पु.१६-अ, दि.१५.०१.२०२१.

६) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय, क्र.कंत्राट-१२२१/प्र.क्र.०८/नापु १६-अ, दिनांक ०६.०३.२०२३.

७) महाराष्ट्र माथाडी, हमाल व श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम, दि.२८.०४.२०२५.

८) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र: कंत्राट ११२४/प्र.क्र.७५/ना.पु.१६-अ, दि.२१.०४.२०२६.

**प्रस्तावना:**

भारतात अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) एक महत्वाचा घटक म्हणून काम करते. राज्यात अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग तंत्रज्ञानातील प्रगती आणि पायाभूत सुविधांच्या सुधारणेद्वारे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये आधुनिकीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करीत आहे. अन्नधान्याच्या खरेदीपासून ते लाभार्थ्यांना धान्य वितरण करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता, कार्यक्षमता आणि वितरीत अन्नधान्याचा मागोवा घेण्यामध्ये सुधारणा करणे, हे या उपक्रमाचे उद्दीष्ट आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा

करण्यासाठी आणि राज्यभरात रास्त भावामध्ये अन्नधान्याच्या वितरणात पारदर्शकता वाढविण्यासाठी हा विभाग काम करीत आहे. धान व भरडधान्य खरेदी, धान भरडाई, साठवण, वाहतूक आणि अन्नधान्य वितरणात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्रात एकात्मिक सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) स्थापन करून व त्याची अंमलबजावणी करून सेवा वितरण आणि वास्तविक वेळेत संनियंत्रण सुनिश्चित करणे तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत (पीडीएस) केलेल्या बदलांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी प्रभावी सुधारणा आणि आधुनिकीकरण सुनिश्चित करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या समस्या आणि आव्हाने यशस्वीपणे हाताळणे आवश्यक आहे.

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सर्व टप्प्यांवर पारदर्शकता आणण्यासाठी आणि लाभार्थ्यांना नियमित व विहित कालावधीत अन्नधान्य पोहोचविण्याकरिता सुधारीत अन्नधान्य वितरण पद्धत संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेली आहे. यातील नवीन वाहतूक पद्धतीनुसार भारतीय अन्नमहामंडळाच्या बेस डेपोपासून शिधावाटप दुकानापर्यंत, जिल्हानिहाय एकाच वाहतूकदारामार्फत शासकीय खर्चाने अन्नधान्याची वाहतूक करण्यात येते.

केंद्र शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याच्या वाहतूक खर्चात बचत होण्याच्या दृष्टीने पर्याप्त वाहतूक मार्ग (route optimization study) नुसार निश्चित केलेल्या मार्गांवरून वाहतूक करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार राज्यात अन्नधान्य वाहतूक सुरु करण्यात आलेली आहे. याबाबत केंद्र शासनाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत लाभार्थ्यापर्यंत करण्यात येत असलेल्या अन्नधान्य वाहतुकीच्या खर्चाचा केंद्र व राज्याचा हिस्सा अनुक्रमे ५०:५० असा आहे. पर्याप्त वाहतूक मार्ग (route optimization) अन्वये उपलब्ध अन्नधान्य साठ्यानुसार त्याच्या उचलीकरिता वेळोवेळी जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील गोदामे जोडण्यात येतात. यापूर्वीच्या करारनाम्यानुसार केवळ जिल्ह्यातील गोदामातून अन्नधान्य उचल करावी अशी तरतूद होती. तथापि, यापुढे त्यामध्ये बदल प्रस्तावित असून, सदर बदल लागू झाल्यानंतर संबंधित वाहतुकदारास वेळोवेळी प्राप्त आदेशानुसार जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील गोदामांमधून अन्नधान्य उचल करावी लागणार आहे.

सद्यस्थितीत शासकीय गोदामांमध्ये अन्नधान्य हाताळणूकीची कामे माथाडी मंडळे, हमाल संस्था यांच्याकडील हमाल कामगारांकडून करण्यात येतात. ही सर्व कामे ही माथाडी कायद्यातील तरतूदीनुसार होतात. विभागाच्या संदर्भ क्र.६ येथील दि.०६.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये हमाल कंत्राटदार संस्थांनी, माथाडी कायद्यातील तरतूदीनुसार, नोंदीत हमाल कामगारांची मजूरी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माथाडी मंडळात जमा करणे बंधनकारक आहे. संबंधित संस्थेने हमालांच्या वेतनाची रक्कम माथाडी मंडळाकडे जमा केल्यानंतर माथाडी मंडळ हमालांना वेतन अदा करते. तथापि, काही हमाल संस्था या विहीत मुदतीत रकमा जमा करत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे हमालांना वेतन वेळेवर मिळत नाही. वेतन वेळेवर न मिळाल्यामुळे हमाल संपावर जाणे, आंदोलन करणे, काम बंद करणे इ. भूमिका घेतात. यामुळे अन्नधान्याची उचल व वितरण होण्यास विलंब होतो. याचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे धान्य वाहतूकीवर विपरीत परिणाम होऊन लाभार्थी लाभापासून वंचीत राहण्याची शक्यता वाढते. हमालांनी काम करण्यास नकार दिल्यास गोदामांवर गेलेल्या वाहनांमध्ये अन्नधान्य भरले जात नाही, त्यामुळे वाहने तशीच परत रिकामी आणावी लागतात किंवा गोदामांवर उभी करावी लागतात. त्यामुळे वाहतूक कंत्राटदारांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. याव्यतिरिक्त हमाल संस्था निवडीकरिता निविदाप्रक्रीया राबविताना निवड न झालेल्या संस्थांकडून बऱ्याच वेळा व्यथीत होऊन न्यायालयात याचिका दाखल

करण्यात येतात. सदर न्यायालयीन प्रकरणी शासनाचा वेळ, मनुष्यबळ तसेच निधी खर्ची पडतो. त्याचप्रमाणे काही जिल्ह्यांमध्ये कार्यरत माथाडी मंडळांकडून देखील हमालीचे काम सुरळीत होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

त्याचप्रमाणे लाभार्थ्यांना नियमित व विहीत कालावधीत अन्नधान्य पोहचविण्यासाठी अन्नधान्य वितरण कार्यपध्दतीमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता, गुणवत्ता आणण्याच्या दृष्टीने डिजीटलायझेशन तंत्रज्ञान आणि यांत्रिकी पध्दतीने लोडिंग/अनलोडिंग कार्यपध्दतीचा समावेश करणे गरजेचे आहे. पारंपारिक अन्नधान्य हाताळणूकीच्या कार्यपध्दतीमध्ये येणाऱ्या खर्चाच्या तुलनेमध्ये यांत्रिकी पद्धतीने लोडिंग/अनलोडिंग व भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून उचल केलेली धान्याची गोणी जशीच्या तशी शिधावाटप दुकानापर्यंत पोहोच करणे, अशा सुधारीत अन्नधान्य हाताळण्याच्या कार्यपध्दतीव्दारे येणाऱ्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

सद्यस्थितीत राज्यामध्ये लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्याची वाहतूक व शासकीय गोदामांमध्ये अन्नधान्याची हाताळणूक यासाठी स्वतंत्ररित्या कंत्राटे निश्चित करण्यात येतात. त्यानुषंगाने संदर्भ क्र.५ येथील दि.१५.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२२ ते २०२५ या कालावधीसाठी अन्नधान्य वाहतूक कंत्राटे निश्चित करण्यात आली होती. त्यापैकी ५ परिमंडळे व २१ जिल्ह्यांमधील वाहतूक कंत्राटांचा कालावधी संपला असून ती वाहतूक कंत्राटे मुदतवाढीमध्ये कार्यान्वित आहेत. अन्नधान्य वाहतूक व गोदामस्तरावरील अन्नधान्य हाताळणूकीच्या कामामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, सदर कामांमध्ये सुसूत्रता आणून त्याची कार्यक्षमता वाढविण्याचा विभागाचा दृष्टीकोन आहे. यासाठी सध्या मुदतवाढीमध्ये कार्यरत असलेली कंत्राटे; तसेच ज्या वाहतूक कंत्राटांची मुदत अजून संपलेली नाही, अशा सर्व परिमंडळ आणि जिल्ह्यातील अन्नधान्य वाहतूक व अन्नधान्य हाताळणूक करण्यासाठी एकत्रित निविदाप्रक्रिया राबविणे सोईचे असल्याने, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळे व राज्यातील सर्व जिल्ह्यात वाहतूक कंत्राट राबविण्याकरिता अन्नधान्य वाहतूकीसाठी प्रति क्विंटल आधारभूत दरांना मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळास सादर करण्यात आला होता. त्यावर मंत्रीमंडळ बैठकीमध्ये प्रति क्विंटल दरांऐवजी प्रति क्विंटल प्रति किलोमीटर याप्रमाणे आधारभूत दर निश्चित करून निविदा प्रक्रीया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. मा.मंत्रीमंडळाच्या दि.१०.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे:-

**<u>शासन निर्णय:-</u>**

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सुधारीत धान्य वितरण प्रणालीमध्ये थेट वाहतूकीचे कार्यक्षेत्र वाढवून नवीन वाहतूक पद्धतीनुसार गहु, तांदूळ, डाळी, साखर, सीएमआर, भरडधान्य (शासनाने वेळोवळी घेतलेल्या निर्णयानुसार अन्य शिधावस्तू) इत्यादीची वाहतूक करुन ती रास्त भाव दुकानांद्वारे वितरीत करण्याकरिता अन्नधान्य वाहतूक व अन्नधान्य हाताळणूकीसाठी राज्यातील सर्व जिल्हे व मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळांमध्ये कंत्राटदाराची निवड करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्हे व मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळांमध्ये एकसमानतेच्या दृष्टीने व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. यानुसार अन्नधान्य वाहतूक व अन्नधान्य हाताळणूक संदर्भातील निविदा प्रक्रियेसाठीच्या अटी व शर्ती, त्याचप्रमाणे मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

## (१) लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालींतर्गत सुधारीत वाहतूक पद्धत:-

१.१ **थेट वाहतूकः-** मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळे, १२ जिल्ह्यांतील (पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, छ.संभाजीनगर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, नागपूर.) अन्नधान्य वितरण कार्यालयांतर्गत क्षेत्रे तसेच राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रे, जिल्हा मुख्यालय व तालुक्यांच्या मुख्यालयांपासून १० किमी परिघातील शिधावाटप दुकानांपर्यंत १) भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून गहू, तांदुळ व अन्य शिधावस्तूंची थेट वाहतूक करुन ते शिधावाटप दुकानांमध्ये वजन करुन उतरवून देणे, त्याची दुकानांमध्ये थप्पी लावून देणे. २) भरडधान्य/सीएमआर उत्पादक जिल्ह्यातून भरडधान्य/सीएमआरची थेट वाहतूक करुन ते शिधावाटप दुकानांमध्ये वजन करुन उतरवून देणे, त्याची दुकानांमध्ये थप्पी लावून देणे. ३) त्याचप्रमाणे साखर, डाळी व अन्य शिधावस्तूंची तालुका शासकीय गोदामातून वाहतूक करुन ते शिधावाटप दुकानांमध्ये वजन करुन उतरवून देणे, त्याची दुकानांमध्ये थप्पी लावून देणे.

१.२ **द्वारपोच वाहतूक पद्धत:- म्हणजे खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली पहिला टप्पा व दुसरा टप्पा एकत्रित संपूर्ण वाहतूक पद्धत.**

१.२.१ **पहिल्या टप्प्याची वाहतूक (भाग-१) -:** परिच्छेद क्र.१.१ मधील थेट वाहतूक वगळता उर्वरित ग्रामीण भागात, भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोपासून गहू, तांदूळ, व अन्य शिधावस्तूंची जिल्ह्यामधील शासकीय धान्य गोदामापर्यंत वाहतूक करणे. तालुका शासकीय गोदामामध्ये धान्य उतरविणे, त्याचे प्रमाणीकरण करून थप्पी लावणे. त्याचप्रमाणे भरडधान्य/सीएमआर उत्पादक जिल्ह्यातून भरडधान्य/सीएमआरची वाहतूक करून इतर जिल्ह्यामधील तालुका शासकीय गोदामांमध्ये धान्य उतरविणे, त्याचे प्रमाणीकरण न करता वजन करून थप्पी लावणे.

१.२.२ **दुसऱ्या टप्प्याची वाहतूक (भाग-२):-**तालुका शासकीय गोदामांमधील धान्याची थप्पी मोडून, धान्य ट्रकमध्ये लोड करणे. थेट वाहतूक वगळता उर्वरित ग्रामीण भागात शासकीय धान्य गोदामापासून शिधावाटप दुकानांपर्यंत अन्नधान्य व इतर शिधावस्तूंची वाहतूक करुन ते शिधावाटप दुकानांमध्ये वजन करुन उतरवून देणे व त्याची दुकानांमध्ये थप्पी लावून देणे.

१.२.३ उपरोक्त नमूद १.२.१ व १.२.२ मिळून द्वारपोच वाहतूक पूर्ण होईल. म्हणजेच जोपर्यंत १.२.२ प्रमाणे दुसऱ्या टप्प्याची वाहतूक पूर्ण होत नाही, तोपर्यंत द्वारपोच वाहतूक पूर्ण होत नाही.

१.२.४ आगामी कालावधीत थेट वाहतूकीची मर्यादा टप्प्याटप्प्याने वाढवून संपूर्ण जिल्ह्यामध्ये १००% थेट वाहतूक सुरू करण्यात येईल.

१.३ वरीलप्रमाणे अन्नधान्य वाहतूकीची तसेच अन्नधान्य हाताळणूकीची जबाबदारी पार पाडण्यासाठी परिमंडळ व जिल्हानिहाय स्वतंत्र वाहतूक कंत्राट निश्चिती करण्यात येईल.

१.४ मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळे, जिल्हानिहाय कंत्राटांमध्ये १२ जिल्ह्यातील (पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, छ.संभाजीनगर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, नागपूर.) अन्नधान्य वितरण कार्यालयांतर्गत क्षेत्रे, जिल्ह्यांतील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रे, जिल्हा मुख्यालय व सर्व तालुक्यांच्या मुख्यालयापासून १० किमी परिघातील शिधावाटप दुकानांपर्यंत अट

क्र.१.१ नुसार थेट वाहतूक करण्यात येईल. तर उर्वरित ग्रामीण भागामध्ये अट क्र.१.२ नुसार दोन टप्प्याची वाहतूक करण्यात येईल.

(२) <u>अन्नधान्य हाताळण्याची सुधारीत कार्यपध्दती:-</u>

२.१ तालुका शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूक प्रचलित पद्धतीनुसार माथाडी मंडळाकडील हमाल कामगारांकडून करण्यात येईल. तर थेट वाहतुकीदरम्यान होणारी तसेच रास्त भाव दुकानातील अन्नधान्य हाताळणूक वाहतूकदाराकडून करण्यात येईल.

३. **निविदा प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी:-**

३.१ लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत विविध योजनेतील अन्नधान्य (साखर व डाळीसह) (CMR व भरडधान्यासह) वाहतूक कंत्राट निश्चितीकरिता खुल्या ई-निविदा मागविणे, निविदा प्रक्रिया राबविणे इत्यादी कार्यवाही शासन स्तरावरून पूर्ण करण्यासाठी मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेस अनुसरून प्रशासकीय विभागस्तरावर पुढीलप्रमाणे **निविदा प्रक्रिया समिती** स्थापन करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | सह सचिव/उपसचिव (कार्यासन नापु-१६ अ), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २ | उपायुक्त (पुरवठा), कोकण विभाग. | सदस्य |
| ३ | उप नियंत्रक, शिधावाटप (मागणी शाखा), मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र. | सदस्य |
| ४ | प्रादेशिक परिवहन अधिकारी (मुंबईतील) | सदस्य |
| ५ | वित्तिय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई. | सदस्य |
| ६ | कक्ष अधिकारी, (कार्यासन नापु-१६ अ), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य सचिव |

३.२ प्राप्त निविदांची छाननी करण्याची कार्यवाही निविदा प्रक्रीया समितीची राहील. तांत्रिक अर्हता पडताळणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार निविदा प्रक्रीया समिती एका गटाची स्थापना अथवा सनदी लेखापालाची नियुक्ती करतील.

३.३ शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया समितीमार्फत विभागातील तांत्रिक सल्लागारांकडून online निविदेचा मसुदा तयार करून त्यास निविदा प्रक्रीया समितीची मान्यता घेईल.

३.४ राज्यातील सर्व जिल्हे/परिमंडळनिहाय स्वतंत्र निविदांच्या मसुद्यास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर या https://mahatenders.gov.in या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

३.५ निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडणे, निविदाकारास तांत्रिकदृष्ट्या पात्र/अपात्र ठरविण्यासाठी छाननी करणे, त्याबाबतचा अहवाल राज्यस्तरीय समितीकडे पाठविणे, राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेनंतर दराचा लिफाफा उघडणे व अंतिम मंजूरीसाठी सर्व निविदा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे सादर करणे इत्यादी कार्यवाही निविदा प्रक्रिया समिती करेल.

३.६ न्यूनतम दर मंजूर झालेल्या निविदाकाराशी विहित कालावधीत करारनामा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांची राहील.

३.७ जिल्ह्याची/परिमंडळाची निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणत्याही कारणास्तव स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार शासनाकडे राहिल. याबाबत शासनाचा निर्णय अंतिम राहील.

३.८ निविदा प्रक्रिया जरी शासन स्तरावरुन राबविण्यात आली तरी, संबंधित क्षेत्रामध्ये लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याची जबाबदारी पूर्वीप्रमाणेच जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांची राहील.

## (४) निविदा प्रक्रिया:-

४.१ अन्नधान्य वाहतूक व अन्नधान्य हाताळणूक याकरिता खुली ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.२ निविदाकारास तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरविणे व निविदा प्रक्रीयेत सादर केलेल्या दरांना मंजूरी देणे, इत्यादी कार्यवाही राज्यस्तरीय समिती पार पडेल.

४.३ निविदा फॉर्म सोबत या शासन निर्णयाची छायांकित प्रत उपलब्ध करुन द्यावी.निविदेस व्यापक प्रसिध्दी मिळेल याची दक्षता घ्यावी.

४.४ निविदा प्रसिध्द केल्यानंतर, निविदा सादर करण्यापूर्वी, इच्छूक निविदाकारांबरोबर VC द्वारे निविदा पूर्व बैठक (Pre-bid Conference) घेण्यात येईल.

## (५) निविदा प्रक्रियेसाठी आधारभूत दर:-

५.१ वाहतूकीच्या कार्यपद्धतीनुसार निविदाप्रक्रीयेसाठी निर्धारित केलेले वाहतूकीचे प्रति क्विंटल प्रति किलोमीटर आधारभूत दर (Base Rate) पुढीलप्रमाणे असतील.

<table>
<tr><th>अन्नधान्य वाहतूक पद्धत</th><th colspan="2">आधारभूत दर (Base Rate) (रूपये प्रति क्विंटल प्रति किलोमीटर)</th><th>निविदाकाराची दराची टक्केवारी (+/-) (वाहतूकीच्या सर्व टप्प्यांसाठी एकत्रित)</th></tr>
<tr><td>१</td><td colspan="2">२</td><td>३</td></tr>
<tr><td rowspan="6">थेट वाहतूक, पहिला टप्पा व दुसरा टप्पा या दरम्यान होणारी अन्नधान्य वाहतूक.</td><td>टप्पा</td><td>आधारभूत दर</td><td rowspan="6">(+/- टक्के)</td></tr>
<tr><td>०-८ किमी</td><td>१४.९५</td></tr>
<tr><td>९-२० किमी</td><td>०.७५</td></tr>
<tr><td>२१-४० किमी</td><td>०.६५</td></tr>
<tr><td>४१-८० किमी</td><td>०.५५</td></tr>
<tr><td>८१ किमी व त्यापुढे</td><td>०.३५</td></tr>
</table>

५.२ निविदाप्रक्रीयेसाठी निर्धारित केलेले **अन्नधान्य हाताळणूकीचे** प्रति क्विंटल आधारभूत दर (Base Rate) पुढीलप्रमाणे असतील.

| अन्नधान्य हाताळणूक पद्धत | आधारभूत दर | निविदाकाराची दराची टक्केवारी (+/-) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| तालुका शासकीय गोदामातील होणारी अन्नधान्य हाताळणूक. | **रू.३७ प्रति क्विंटल (किमान)** (आवक-जावक हाताळणूकीसाठी वेतन आणि लेव्ही तसेच सेवा शुल्क व इतर शुल्क इत्यादीच्या समावेशासह) | (+/- टक्के) |

**टीप-** निविदाकाराची निवड हि अन्नधान्य वाहतुकीकरिता सादर करण्यात येणाऱ्या न्यूनतम दरांवर करण्यात येणार आहे.

५.३ विविध योजनेंतर्गत प्रत्येक महिन्यामध्ये दोन टप्प्यात वाहतूक केलेल्या धान्यादी वस्तूंकरिता **प्रति मेट्रिक टन ५०० ग्रॅम पर्यंत** तूट क्षमापित राहील. त्यावरील तुटीची वसुली नियमाप्रमाणे देयकातून करण्यात यावी. संबंधित महिन्यामध्ये विविध योजनाअंतर्गत वाहतूक केलेल्या धान्यादी वस्तूची तुटीची परिगणना योजनानिहाय वेगळी न करता एकत्रित करण्यात यावी.

५.४ सुरूवातीस मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळे, १२ जिल्ह्यातील अन्नधान्य वितरण कार्यालयांतर्गत क्षेत्रे, राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रे, जिल्हा मुख्यालय व तालुक्याच्या मुख्यालयांपासून १० किमी परिघातील शिधावाटप दुकानांपर्यंत भारतीय अन्न महामंडळाच्या नियमित बेस डेपोपासून थेट वाहतूक करण्यात येईल. तद्नंतर उर्वरित ठिकाणी टप्प्याटप्प्याने थेट वाहतूकीच्या कार्यक्षेत्रामध्ये वाढ करण्यात येईल. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ महिन्याच्या आत जिल्ह्यातील सर्व क्षेत्र (१०० % क्षेत्र) हे थेट वाहतूकीमध्ये समाविष्ट केले जाईल.

५.५ जे वाहतूकदार कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून उपरोक्त परिच्छेद क्र.१.१ नुसार थेट वाहतूक करण्यास तसेच परिच्छेद क्र.५.४ नुसार थेट वाहतूक क्षेत्र वाढविण्यास टाळाटाळ करतील/असमर्थ ठरतील, अशा प्रकरणी अन्नधान्य हाताळणूक, सुतळी तसेच गोदामस्तरावरील इतर अनुषंगिक बाबींकरिता होणाऱ्या खर्चाची वसुली संबंधित वाहतूकदाराच्या देयकातून करण्यात यावी.

५.६ शासनाने आदेश दिल्यास वाहतूकदारास, CMR उत्पादक जिल्ह्यांमध्ये तयार होणाऱ्या सीएमआर तांदळाची तसेच किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी होणाऱ्या भरडधान्याची, जिल्ह्याबाहेरील बेस डेपो पासून वाहतूक करावी लागेल. सदर सीएमआर/भरडधान्याची वाहतूक होणार असेल तर, अशी वाहतूक सीएमआर/भरडधान्य उत्पादक जिल्ह्यातील बेस डेपोपासून ते सीएमआर/भरडधान्य वाहतूक होणाऱ्या जिल्ह्याच्या सीमेपर्यंत (पहिला टप्पा) तसेच जिल्ह्याच्या सीमेपासून ते शिधावाटप दुकान (दुसरा टप्पा) याप्रमाणे करावी लागेल. अशा परिस्थितीत वाहतूकदारास पहिल्या टप्प्याच्या अंतराकरीता

(सीएमआर उत्पादक जिल्ह्यातील बेस डेपोपासून ते सीएमआर वाहतूक होणाऱ्या जिल्ह्याच्या सीमेपर्यंत) केंद्र शासनाद्वारे/राज्यस्तरीय SoR समितीमार्फत वर्षनिहाय निश्चित करण्यात येणाऱ्या दरानुसार देयकाची अदायगी करण्यात येईल. तसेच दुसऱ्या टप्प्याच्या वाहतूकीकरिता (जिल्ह्याच्या सीमेपासून ते शिधावाटप दुकानापर्यंत) राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत (NFSA) निश्चित केलेल्या दरानुसार (५.१ चे आधारभूत दर +/- जितके टक्के कमी/अधिकची निविदा भरण्यात येईल.) परिगणना करून देयकांची अदायगी करण्यात यावी.

५.७ शासन निर्णयामध्ये CMR वाहतूकीचा समावेश असला, तरीदेखील CMR वाहतूक कोणत्या जिल्ह्यांना व किती प्रमाणात द्यावयाची याचा अधिकार शासनास राहील.

५.८ अचानक उद्भवलेल्या नैसर्गिक किंवा मानव निर्मित आपत्ती दरम्यान इंधनाच्या चालू दरांमध्ये १०% पेक्षा अधिक दरवाढ झाल्यास किंवा १०% पेक्षा अधिक दरघट झाल्यास, अशा परिस्थितीत वाढीव दरवाढ/दरघट ज्या प्रमाणात होईल, त्याप्रमाणात वाहतूकदारास मंजूर केलेल्या दरांमध्ये दरवाढ/दरघटीचा समावेश करून वाहतूकदाराची देयके या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-अ** परिगणीत करण्यात येतील.

**(६) <u>निविदेच्या पात्रतेचे निकष व अटी-शर्ती:-</u>**

६.१ निविदाकाराने निविदा भरताना पुढील बाबींचा विचार करून निविदा सादर करणे अनिवार्य राहील.

६.१.१ खाजगी संस्था (कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी असलेली)/फर्म/भागिदारी संस्था (पार्टनरशिप फर्म)/सहकारी संस्था/सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा अंतर्गत नोंदणी असलेली विश्वस्त संस्था निविदेत सहभाग नोंदवण्यास पात्र असतील.

६.१.२ सदर संस्थेचे भारतामध्ये नोंदणीकृत कार्यालय व महाराष्ट्रामध्ये कायदेशीर अस्तित्व असणे अनिवार्य आहे.

६.१.३ खाजगी संस्था (कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी असलेली)/फर्म/भागिदारी संस्था (पार्टनरशिप फर्म)/सहकारी संस्था/सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा अंतर्गत नोंदणी असलेली विश्वस्त संस्था यांच्या घटना/नियम नियमावलीमध्ये संस्थेच्या उद्देशामध्ये सार्वजनिक/शासकीय अन्नधान्य वाहतुकीच्या कामाचा समावेश असावा.

६.१.४ निविदेमध्ये सहभाग नोंदवला जात असलेला जिल्हा/परिमंडळ, संस्थेच्या घटना/नियम नियमावलीतील कार्यक्षेत्रामध्ये असावा.

६.२ **<u>कामाचा अनुभव:-</u>**

६.२.१ **मुंबई शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळासाठी कामाचा अनुभव:-**मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळासाठी कामाचा अनुभव पुढीलप्रमाणे राहील. निविदाकारास मागील ५ (२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) सलग संपूर्ण आर्थिक वर्षांपैकी किमान एका संपूर्ण आर्थिक वर्षाचा शासकीय/निमशासकीय अन्नधान्य वाहतुकीच्या कामाचा अनुभव असावा. सदर अनुभव हा, निविदाकार हा ज्या परिमंडळात निविदा भरीत आहे, त्या परिमंडळामध्ये मागील ३ संपूर्ण आर्थिक वर्षात (सन २०२३-२४ २०२४-२५ व २०२५-

२६) अन्नधान्याच्या थेट वाहतूकीच्या झालेल्या कामाच्या किमान ३३ टक्के मेट्रीक टन क्षमतेइतका असावा.

६.२.२ **सर्व जिल्ह्यांकरीता कामाचा अनुभव:**- मागील ५ (२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६) सलग संपूर्ण आर्थिक वर्षापैकी किमान एका संपूर्ण आर्थिक वर्षाचा शासकीय/निमशासकीय अन्नधान्य द्वारपोच वाहतूकीच्या कामाचा अनुभव असावा. सदर अनुभव हा, निविदाकार ज्या जिल्ह्यात निविदा भरीत आहे, त्या जिल्ह्यामध्ये मागील ३ संपूर्ण आर्थिक वर्षात (सन २०२३-२४ २०२४-२५ व २०२५-२६) द्वारपोच वाहतूकीच्या झालेल्या कामाच्या किमान ३३ टक्के मेट्रीक टन क्षमते इतका असावा.

६.२.३ निविदाकार एकापेक्षा अधिक जिल्हा/परिमंडळामध्ये निविदेत सहभाग घेत असल्यास, निविदाकाराचा कामाचा अनुभव हा तो ज्या-ज्या जिल्हा/परिमंडळामध्ये निविदा भरीत आहे, त्या-त्या जिल्हा/परिमंडळामध्ये मागील ३ संपूर्ण आर्थिक वर्षात द्वारपोच/थेट वाहतूक झालेल्या एकूण मेट्रीक टनाच्या किमान ३३ टक्के मेट्रीक टन क्षमतेइतका असावा.

६.२.४ सदरील कामाचा अनुभव हा ज्याच्या नावे निविदा भरण्यात येत आहे, त्याच्याच नावे असणे आवश्यक आहे.

६.२.५ उपरोक्त परिच्छेद क्रमांक ६.२.१,६.२.२ व ६.२.३ मध्ये नमूद कामाचा अनुभव हा द्वारपोच वाहतूक योजना किंवा या योजनेशी साधर्म्य असणाऱ्या केंद्र/राज्य शासनाच्या अन्य योजनांच्या सरकारी/निमसरकारी अन्नधान्य वाहतुकीच्या कामाचा असणे आवश्यक आहे.केंद्र शासन, राज्य शासन व निमशासकीय संस्थांकडील वाहतुकीच्या कामाचा अनुभव ग्राह्य धरण्यासाठी या सर्व कामांच्या आदेशाच्या प्रती व सक्षम अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावे लागेल.

६.३ **आर्थिक क्षमता:-**

६.३.१ **परीमंडळ कार्यक्षेत्राकरीता आर्थिक क्षमता:**- उपरोक्त परिच्छेद क्र.६.२.१ मध्ये ज्या कालावधीच्या कामाचा अनुभव दाखविण्यात येईल, त्याच कालावधीचा निविदाकाराचा केवळ वाहतुकीचा एकूण किमान आर्थिक व्यवहार (Turnover) हा तो ज्या परिमंडळामध्ये निविदा भरीत आहे, त्या परिमंडळामधील मागील ३ आर्थिक वर्षातील(सन २०२३-२४ २०२४-२५ व २०२५-२६)वाहतुकीवर झालेल्या एकूण खर्चाच्या किमान ३३ टक्के असावा.

६.३.२ **३४ जिल्ह्यांकरीता आर्थिक क्षमता:**- उपरोक्त परिच्छेद क्र.६.२.२मध्ये ज्या कालावधीच्या कामाचा अनुभव दाखविण्यात येईल त्याच कालावधीचा निविदाकाराचा केवळ वाहतुकीचा एकूण किमान आर्थिक व्यवहार (Turn over) हा तो ज्या जिल्ह्यामध्ये तो निविदा भरीत आहे, त्या जिल्ह्यामध्ये मागील३ आर्थिक वर्षात (सन २०२३-२४ २०२४-२५ व २०२५-२६) वाहतूकीवर झालेल्या एकूण खर्चाच्या किमान ३३ टक्के असावा.

६.३.३ निविदाकार एकापेक्षा अधिक जिल्हा/परिमंडळामध्ये निविदेत सहभाग घेत असल्यास, परिच्छेद क्रमांक ६.२.३मध्ये ज्या कालावधीच्या कामाचा अनुभव दाखविण्यात येईल त्याच कालावधीचा निविदाकाराचा केवळ वाहतुकीच्या कामाचा एकूण किमान आर्थिक व्यवहार (Turn over) हा तो ज्या-ज्या जिल्हा/परिमंडळामध्ये निविदा भरीत आहे, त्या-त्या जिल्हा/परिमंडळामध्ये मागील ३ आर्थिक वर्षात (सन २०२३-२४ २०२४-२५ व २०२५-२६) द्वारपोच/थेटवाहतूकीवर झालेल्या एकूण खर्चाच्या किमान ३३ टक्के असावा.

६.३.४ निविदाकाराची दि.३१.०३.२०२६ रोजी सकारात्मक निव्वळ संपत्ती (Positive Net worth) असावी.

६.३.५ एका जिल्ह्याच्या/परिमंडळाच्या निविदेसाठी राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड कमर्शिअल बँकेची रू.१.०० कोटी रकमेची बँक सॉल्व्हन्सी (Bank Solvency) सादर करावी. एकापेक्षा अधिक जिल्ह्यामध्ये/परिमंडळामध्ये निविदा सादर करताना प्रति जिल्हा/परिमंडळ रू.१.०० कोटीच्या प्रमाणात अधिकची राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेची बँक सॉल्व्हन्सी (Bank Solvency) सादर करावी. बँकेकडून जारी केलेले सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र हे निविदा सादर करण्याच्या अंतीम तारखेच्या ३ महिन्यांपेक्षा जुने नसावे.

६.३.६ निविदा फॉर्मची किंमत रू.११८००/- (रु.१०,०००/- अधिक १८% जीएसटी) एवढी राहील. निविदा अर्जाची रक्कम ऑनलाईन भरणे अनिवार्य राहील.

६.४ **<u>बयाना रक्कम/इसारा रक्कम (EMD):-</u>**

६.४.१ निविदेसोबत जिल्ह्यातील/परिमंडळातील मागील ३ आर्थिक वर्षाच्या(सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६)एकूण वाहतूक खर्चाच्या ३% इतकी इसारा रक्कम घेण्यात यावी.

६.४.२ इसाऱ्याची (बयान्याची) रक्कम निविदाकराच्या खात्यामधून NEFT/RTGS द्वारे भरण्यात यावी.

६.४.३ ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांना निविदा भरणे बंधनकारक आहे, निविदा न भरल्यास त्यांची इसाऱ्याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात यावी.

६.४.४ विनिर्दिष्टीत केलेल्या इसारा रकमेपेक्षा कमी रक्कम भरणाऱ्या निविदाकाराची निविदा अपात्र ठरवून भरलेली संपूर्ण रक्कम जप्त करण्यात यावी.

६.४.५ इसारा रक्कम कोणाच्या नावे भरणा करावयाची याचा स्पष्ट उल्लेख निविदा सूचनेत करावा.

६.४.६ निविदेबाबत स्वीकृती आदेश निर्गमित झाल्यानंतर न्यूनतम निविदाकाराव्यतिरिक्त इतर निविदाकरांची बयाना रक्कम ७ दिवसात परत करण्यात येईल. विहित कालावधीमध्ये बयाना रक्कम परत न केल्यास झालेल्या विलंबावर द.सा.द.शे. १०% व्याज देय राहील व त्या व्याजाची वसुली विलंबास जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल. इसारा रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

६.४.७ निविदाकाराकडून खालील बाबींची पूर्तता न झाल्यास इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल.

(i) निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

(ii) विहित मुदतीमध्ये करारनामा न करणे.

(iii) निविदा स्विकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत/बँक गॅरंटी रक्कम न भरणे.

(iv) निविदा दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापूर्वी कोणत्याही अन्य अटींची पूर्तता न करणे.

(v) निविदा प्रक्रियेमध्ये बोगस, छेडछाड केलेली कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आल्यास.

६.५ <u>अनामत रक्कम (बँक गॅरंटी):-</u>

६.५.१ यशस्वी निविदाकाराकडून जिल्ह्यातील/परिमंडळातील मागील ३ आर्थिक वर्षाच्या (सन २०२३-२४ २०२४-२५ व २०२५-२६) एकूण वाहतूक खर्चाच्या ३% इतकी अनामत रक्कम बँक गॅरंटीच्या स्वरूपात घेण्यात येईल. सदर बँक गॅरंटी कोणत्याही अनुसूचित (Scheduled)/राष्ट्रीयकृत कमर्शिअल (Nationalized) बँकेची साडेपाच वर्षांच्या कालावधीची असणे अनिवार्य राहील.

६.५.२ उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी बँक गॅरंटीच्या सत्यतेची पडताळणी संबंधित बँकेकडून करावी.

६.५.३ बँक गॅरंटी ही निविदा मंजूर झाल्यापासून १५ कार्यालयीन दिवसात जमा करण्यात यावी. विशिष्ट परिस्थितीत कालावधी वाढवून देण्याचे अधिकार शासनाकडे राहतील. बँक गॅरंटीकरीता करारनामा थांबविण्यात येऊ नये. तथापि, बँक गॅरंटी प्राप्त झाल्याशिवाय देयके अदा करण्यात येऊ नयेत.

६.५.४ परिच्छेद १२ नुसार वाहतूक कंत्राटास मुदतवाढ देण्याची बाब उद्भवल्यास तसेच या कालावधीत साडे पाच वर्षाचा बँक गॅरंटी कालावधी संपुष्टात आला असल्यास, मुदतवाढीच्या कालावधीकरिता बँक गॅरंटीचे नूतनीकरण करण्याची जबाबदारी संबंधित वाहतूकदाराची राहील व सदर बाब तपासण्याची जबाबदारी संबंधित उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

६.६ <u>प्रतिभूती ठेवीची (Security Deposite) रक्कमः-</u>

६.६.१ निविदा मंजूर निविदाकाराकडून इसारा रकमेइतकी रक्कम प्रतिभूती ठेव म्हणून जमा करून घेण्यात येईल. प्रतिभूती ठेवीच्या रकमेवर कुठल्याही प्रकारे व्याज देय राहणार नाही.

६.७ बँक गॅरंटी व प्रतिभूती ठेव याचा वापर खालील परिस्थितीत करण्यात यावा:-

६.७.१ वाहतूक कंत्राटदाराने वाहतुकीचे व हाताळणूकीचे काम अचानक थांबविल्यास पर्यायी वाहतुकीकरीता आलेल्या खर्चाची वसुली.

६.७.२ वाहतूक कंत्राटदारावर आकारण्यात आलेला दंड वसुल करण्याकरीता अन्य मार्ग शिल्लक नसतील तर.

६.७.३ वाहतूकदाराचे कंत्राट संपलेले आहे परंतु त्याच्याकडून काही येणे आहे, वसुली आहे, ती वसूल करण्यासाठी अन्य मार्ग उपलब्ध नसतील, तर सदरहू रक्कम प्रतिभूती ठेवी व बँक गॅरंटी मधून वसूल करण्यात यावी.

६.८ <u>निविदाकाराच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील आवश्यक वाहनांची एकत्रित वहन क्षमताः-</u>
जिल्ह्याचे मासिक नियतन व महिन्याचे कामाचे अंदाजे २२ दिवस विचारात घेता, मासिक नियतन भागिले २२ दिवस = जितके नियतन येईल, तितक्या क्षमतेपैकी ५० टक्के मालकीची व ५० टक्के नियंत्रणाखालील वाहन क्षमता निविदाकाराची असणे बंधनकारक राहील. सदरील सर्व वाहने RTO च्या निकषांनुसार सुस्थितीत (Fit) असावीत. (उदा. PUC, योग्यता प्रमाणपत्र, वैधता इत्यादी)

६.८.१ भागीदारी संस्था (partnership firm/society), सहकारी संस्था (co-operative society/firm)/खाजगी संस्था (कंपनी कायद्याअंतर्गत)/विश्वस्त संस्था/मर्यादीत दायित्व भागिदारी (LLP) यांच्याबाबतीत निविदा प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वीपासून ज्या नावाने निविदा भरत आहे, त्याच नावाने वाहने असणे आवश्यक आहे.

६.८.२ निविदाकार खाजगी व्यक्ती (Private firm/Proprietary firm) असल्यास निविदेसोबत सादर केलेली मालकीची वाहने खुद्द त्या खाजगी व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक राहील.

६.८.३ तांत्रिक पात्रतेकरीता निश्चित केलेल्या मालकीच्या वाहनांची वहनक्षमता व नियंत्रणाखालील वाहनांची वहनक्षमता या दोन्हींच्या बेरजेएवढी वहनक्षमता असलेली वाहने एखाद्या भागीदारी संस्था (partnership firm/society), सहकारी संस्था (co-operative society/firm)/खाजगी संस्था (कंपनी कायद्याअंतर्गत)/विश्वस्त संस्था/मर्यादीत दायित्व भागिदारी (LLP)/खाजगी व्यक्तीच्या नावे मालकीचे असल्यास, नियंत्रणाखाली स्वतंत्र वाहने असण्याची आवश्यकता नाही.

६.८.४ निविदाकार या विभागाव्यतिरिक्त, केंद्र शासन/राज्य शासनाच्या इतर विभागात तसेच केंद्र राज्य शासनाच्या उपक्रमात/संस्थांमध्ये वाहतूकीचे काम करत असल्यास, सदर ठिकाणी वापरात असलेली वाहने प्रस्तुत निविदा प्रक्रीयेकरिता दर्शविण्यात येऊ नयेत. निविदेत सादर झालेली वाहने केंद्र शासन/राज्य शासनाच्या इतर विभागात वापरत असल्याचे आढळून आल्यास, सदर निविदा अपात्र ठरविण्यात येईल तसेच करारनामा करण्यात आल्यानंतरदेखील सदर बाब आढळून आल्यास, संबंधितांसोबतचा करारनामा रद्द करण्यात येईल त्याचप्रमाणे संबंधितांस ३ वर्षांकरिता काळ्या यादीत टाकण्यात येईल.

६.८.५ निविदेसोबत सादर करण्यात येणाऱ्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांच्या मालकीबाबत व ते संपूर्ण कंत्राट कालावधीकरीता वापरण्यास योग्य असल्याबाबत सक्षम परिवहन अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची (R.C. Book with Fitness Certificate) साक्षांकित केलेली सत्यप्रत निविदेसोबत जोडण्यात यावी. नियंत्रणाखाली वाहने असल्यास, नोंदणीकृत करारनाम्याची प्रत तांत्रिक लिफाफ्यामध्ये जोडण्यात यावी. नियमानुसार आवश्यक वाहनांना सीसीटिव्ही कॅमेरे व त्याची रेकॉर्डीग क्षमता, जी.पी.एस. प्रणाली, लोड सेल, ईलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि या विभागाने निश्चित केलेला रंग वाहनास असणे अनिवार्य राहील. वरील सर्व तांत्रिक बाबी व आवश्यक सुविधा वाहनांना असल्याची पडताळणी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडून करण्यात येईल व त्याबाबतचे एक प्रमाणपत्र संबंधित अधिकाऱ्याकडून घेऊन सदरचे प्रमाणपत्र करारनामा करण्यापूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.

६.८.६ वरीलप्रमाणे आवश्यक असणाऱ्या प्रत्येक वाहनांना अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार अन्नधान्य वाहतुकीचा वैध परवाना असणे अनिवार्य राहील. उपरोक्त वैध परवाने निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करणे अनिवार्य राहील.

६.८.७ निविदेसोबत सादर करण्यात येणाऱ्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांमधून अन्न सुरक्षा व प्रमाणके कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार सिमेंट, खत, रासायनिक पदार्थ, कोळसा ज्यांच्यामुळे नंतर वाहतूक करावयाच्या अन्नधान्याच्या गुणवत्तेवर परिणाम होईल

अशा वस्तूंची वाहतूक कंत्राट कालावधीत करण्यात येणार नाही, असे शपथपत्र निविदाकारास सादर करणे आवश्यक राहील.

६.८.८ निविदाकार एका पेक्षा जास्त ठिकाणी न्यूनतम निविदाकार ठरल्यास, सर्व जिल्ह्यांसाठी आवश्यक क्षमतेची मालकीची व नियंत्रणाखालील वाहने जिल्हाधिकारी/परिमंडळ अधिकाऱ्यांनी करारनामा करण्यास सूचित केल्यापासून ०५ कार्य दिवसात उपलब्ध करुन द्यावी लागतील, तसे न झाल्यास न्यूनतम निविदाकाराचा करारनामा करण्याचा अधिकार संपुष्टात येईल. करारनामा करण्याची मुदत संपल्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच सहाव्या दिवशी जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप याबाबतची माहिती शासनास अवगत करेल. शासन सातव्या दिवशी उपरोक्त जिल्हा/परिमंडळासाठी फेरनिविदा प्रसिध्द करून नवीन वाहतुदाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही करेल. करारनामा करण्यास असमर्थ ठरलेल्या न्यूनतम निविदाकारास फेरनिविदेमध्ये सहभाग नोंदवता येणार नाही.

६.९ निविदाकार ज्या जिल्हा/परिमंडळासाठी निविदा भरणार आहे, त्या जिल्हा/परिमंडळासाठी भारतीय अन्न महामंडळाचे सर्व बेस डेपो, सर्व शासकीय गोदामे आणि प्रत्येक तालुक्यातील थेट वाहतूक व व्दारपोच वाहतूक होत असलेले किमान प्रत्येकी दोन स्वस्त धान्य दुकाने यांची पाहणी करून त्याचे जिओ टॅगिंग केल्याचे फोटो तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/उप नियंत्रक, शिधावाटप यांचे प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करणे अनिवार्य राहील. जिओ टॅगिंगकरीता निविदाकार जिल्हा पुरवठा अधिकारी/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांच्याकडे अर्ज करतील. केलेल्या अर्जानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई हे एका शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना प्राधिकृत करतील. सदर प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्यासमवेत निश्चित केलेल्या ठिकाणांना निविदाकार भेटी देवून प्रत्यक्ष कामकाजाची पाहणी करून जिओ टॅगिंग करतील.

६.१० मागील सलग ५ वर्षात ज्या निविदाकाराची बयाना रक्कम/सुरक्षा ठेव/अनामत रक्कम शासकीय/निमशासकीय विभागाकडून जप्त करण्यात आलेली आहे, असे निविदाकार निविदा प्रक्रियेसाठी पात्र राहणार नाहीत. मात्र त्यासंदर्भात समाधानकारक कागदपत्रे ते सादर करु शकल्यास राज्यस्तरीय समिती त्यांना पात्र ठरविण्याबाबतचा निर्णय घेऊ शकेल तसेच, शासकीय/निमशासकीय विभागाकडून निविदाकारास मागील ५ वर्षात काळ्या यादीमध्ये (Blacklisted) समाविष्ट केलेले नसावे.

६.११ मागील सलग ५ वर्षात शासकीय/निमशासकीय कामाच्या बाबतीत करारनामा पूर्ण होण्यापूर्वी वाहतूक कंत्राटदार अकार्यक्षम ठरल्याने ज्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले असेल, अशा संस्था/व्यक्ती निविदा प्रक्रियेसाठी पात्र राहणार नाहीत.

६.१२ एकापेक्षा अधिक संस्थांना एकत्रितपणे/सामूहीकरित्या (Joint venture/Consortioum not allowed) निविदेत सहभाग नोंदवता येणार नाही.

६.१३ निविदाकारास जास्तीत जास्त ३ जिल्ह्यांमध्ये/परिमंडळामध्ये निविदा सादर करता येईल. निविदाकाराने ३ पेक्षा अधिक जिल्ह्यांसाठी/परिमंडळांसाठी अर्ज केला, तर तो निविदाकार अपात्र ठरवला जाईल.

## (७) निविदा पध्दती व मुदतवाढ:-

७.१ वाहतूक निविदेकरीता द्वि-लिफाफा पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये पहिला लिफाफा "अ" हा तांत्रिक लिफाफा असेल, ज्यामध्ये निविदाकाराची पात्रता सिद्ध करणारे पुरावे व निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरीत केलेले दस्तऐवज असतील. दुसरा लिफाफा "ब" हा व्यापारी (दरविषयक) लिफाफा असेल, ज्यात निविदाकार आपले दर नमूद करेल.

७.२ निविदा प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून निविदा सादर करण्यासाठी ३ आठवडे किंवा कामाचे किमान १५ दिवस यापैकी जे जास्त असेल एवढा कालावधी निश्चित करण्यात येईल. जिल्ह्यासाठी/परिमंडळासाठी ३ पेक्षा कमी निविदाकारांनी सहभाग नोंदवल्यास प्रथम १ आठवड्याची, तद्नंतरही ३ पेक्षा कमी निविदाकारांनी सहभाग नोंदवल्यास, दुसऱ्यांदा १ आठवड्याची मुदतवाढ देण्यात येईल. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

७.३ ३ किंवा ३ पेक्षा अधिक निविदाकारांनी सहभाग नोंदवला असल्यास आणि किमान २ निविदाकार तांत्रिक अर्हतेमध्ये पात्र ठरल्यास, राज्यस्तरीय समिती पात्र निविदाकारांचा व्यापारी (दराचा) लिफाफा उघडण्याची कार्यवाही करेल.

७.४ प्रशासकीय व तांत्रिक कारणास्तव अधिकची मुदतवाढ देण्याचा अधिकार राज्यस्तरीय समितीस राहील.

**७.५ तांत्रिक लिफाफा 'अ' मध्ये पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.**

| अ.क्र. | | कागदपत्रांची सूची |
|---|---|---|
| १ | | निविदा अर्ज शुल्क भरल्याचा पुरावा. |
| २ | | बयाना रक्कम (EMD) जमा केल्याचा पुरावा. |
| ३ | | निविदाकाराच्या PAN कार्डाची साक्षांकित प्रत. |
| ४ | | निविदाकाराच्या GST नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. |
| ५ | | अट क्र. ६.३.५ प्रमाणे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड कमर्शिअल बँकेची बैंक सॉल्व्हन्सी. |
| ६ | | खाजगी संस्था (कंपनी कायद्याअंतर्गत)/फर्म/भागीदारी संस्था (पार्टनरशिप फर्म) / सहकारी संस्था/सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यांतर्गत नोंदणी असलेली विश्वस्त संस्था यांचे नोंदणी प्रमाणपत्र. |
| | ६.१ | लागू असल्यास, घटना / नियम नियमावली / मेमोरेण्डम ऑफ असोसिएशन. |
| | ६.२ | लागू असल्यास, ६.१.१ नुसार खाजगी संस्था (कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी असलेली)/फर्म/भागिदारी संस्था (पार्टनरशिप फर्म)/सहकारी संस्था/सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा अंतर्गत नोंदणी असलेली विश्वस्त संस्थेच्या घटना/नियम नियमावलीमध्ये संस्थेच्या उद्देशामध्ये सार्वजनिक/शासकीय अन्नधान्य वाहतुकीच्या कामाचा समावेश असल्याचा पुराव्यादाखल घटना/नियम नियमावलीची प्रत. |
| | ६.३ | निविदेमध्ये सहभाग नोंदवला जात असलेला जिल्ह्याच्या नावाचा समावेश संस्थेच्या घटना/नियम नियमावलीतील कार्यक्षेत्रामध्ये असल्याच्या पुराव्यादाखल घटना/नियम नियमावलीची प्रत. |

| | | |
|---|---|---|
| | ६.४ | सहकारी संस्था/सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा अंतर्गत नोंदणी असलेली विश्वस्त संस्थेचे विद्यमान विश्वस्त मंडळ संचालक मंडळातील सदस्यांची नाव, पत्ता व संस्थेमधील पदनाम सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राधिकृत करून सादर करावे. |
| ७ | | शॉप ॲक्ट परवाना (व्यवसाय म्हणून अन्नधान्य वाहतुकीचा स्पष्ट उल्लेख असलेला) |
| ८ | | अन्न सुरक्षा मानदे व प्रमाणके कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार संस्थेच्या नावाचे अन्नधान्य वाहतुकीचे वैध प्रमाणपत्र |
| ९ | | **परिमंडळ क्षेत्राकरीताः-**<br>(i) अट क्र.६.२.१ मध्ये नमूद केलेल्या कामाचा अनुभव सिध्द करण्याकरीता मागील ५ आर्थिक वर्षापैकी (सन२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) १ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी नमूद असलेले वाहतूक करारनामे, कार्यादेश व सक्षम अधिकाऱ्याचे (वर्ग-१ दर्जापेक्षा कमी नसलेल्या) समाधानकारकरित्या कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.<br>(ii) मागील ५ आर्थिक वर्षातील (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) अट क्र.६.२.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे थेट वाहतुकीच्या मेट्रीक टन मधील आकडेवारीचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र. |
| १० | | **३४ जिल्ह्याकरीताः-**<br>(i) अट क्र.६.२.२ मध्ये नमूद केलेल्या कामाचा अनुभव सिध्द करण्याकरीता मागील ५ आर्थिक वर्षापैकी (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) १ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी नमूद असलेले वाहतूक करारनामे, कार्यआदेश व सक्षम अधिकाऱ्याचे (वर्ग-१ दर्जापेक्षा कमी नसलेल्या) समाधानकारकरित्या कामकाज केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.<br>(ii) मागील ५ आर्थिक वर्षातील (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) अट क्र.६.२.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वारपोच वाहतूक मेट्रीक टन मधील आकडेवारीचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र. |
| ११ | | अट क्र.६.३ मध्ये नमूद केलेली निविदाकाराची आर्थिक क्षमता सिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे-<br>(i) मागील ५ आर्थिक वर्षातील (सन २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५) सनदी लेखापालाचे लेखापरिक्षण अहवाल (Audit Report) (२०२५-२६ वगळून)<br>(ii) मागील ५ आर्थिक वर्षातील (सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) थेट वाहतूक व द्वारपोच वाहतूकीच्या आर्थिक व्यवहाराचे (Turn over) सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र. |
| १२ | | दि.३१/०३/२०२६ रोजी सकारात्मक निव्वळ संपत्ती (Positive Net worth) बाबतचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र. |
| १३ | | थेट तसेच द्वारपोच वाहतूकीच्या अनुभवाचा उल्लेख असलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र तसेच प्रत्यक्षात थेट/द्वारपोच वाहतूक केल्याचे पुरावे. (ट्रांझिट पास/परमिट यांच्या कोणत्याही एका महिन्याच्या ५ प्रती.) |

| | | |
|---|---|---|
| १४ | | मालकीच्या व नियंत्रणाखालील प्रत्येक वाहनांच्या आर.सी.बुक व फिटनेस सर्टीफिकेट, रस्तामार्गाद्वारे वहन अधिनियम, २००७ व २०११ अन्वये लागणारे नोंदणी प्रमाणपत्र (संबंधित सक्षम अधिकाऱ्याने दिलेले) यांच्या साक्षांकित प्रती. |
| १५ | | नियंत्रणाखालील वाहने असल्यास ५ वर्ष कालावधीची नोंदणीकृत करारनाम्याची प्रत. |
| १६ | | निविदेत नमूद केल्याइतक्या वहनक्षमतेच्या पृष्ठ्यर्थ मालकीच्या व नियंत्रणखालील वाहनांचे क्रमांक, त्यांची क्षमता, मालकी इत्यादी बाबी दर्शविणारे विवरणपत्र. ही वाहने पूर्ण कंत्राट कालावधीसाठी उपलब्ध करून देण्यात येतील, असे शपथपत्र. (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर) |
| १७ | | निविदाकार एका पेक्षा जास्त ठिकाणी न्यूनतम निविदाकार ठरल्यास सर्व जिल्ह्यासाठी आवश्यक क्षमतेची मालकीची व नियंत्रणाखालील वाहने जिल्हाधिकारी/परिमंडळ अधिकाऱ्यांनी करारनामा करण्यास सूचित केल्यापासून ०५ कार्यदिवसात उपलब्ध करून देण्यास बांधील राहील व ०५ कार्यदिवसात मालकीची वाहने उपलब्ध करून न दिल्यास करारनामा करण्याचा अधिकार संपुष्टात येईल, ही अट मान्य असल्याबाबतचे शपथपत्र (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर) |
| १८ | | मालकीच्या व नियंत्रणाखालील सर्व वाहनांचे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार अन्नधान्य वाहतुकीचे वैध प्रमाणपत्र. |
| १९ | | निविदेसोबत सादर करण्यात येणाऱ्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांमधून अन्न सुरक्षा व प्रमाणके कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार सिमेंट, खत, रासायनिक पदार्थ, कोळसा ज्यांच्यामुळे नंतर वाहतूक करावयाच्या अन्नधान्याच्या गुणवत्तेवर परिणाम होईल अशा वस्तूंची वाहतूक कंत्राट कालावधीत वाहतूक करण्यात येणार नाही असे शपथपत्र. (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर) |
| २० | | मुद्दा क्र.६.९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणीत केलेले जिओ टॅगिंगचे फोटो तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/उप नियंत्रक, शिधावाटप यांचे प्रमाणपत्र. |
| २१ | | शासन निर्णयातील सर्व तरतूदी, अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे व त्यास बांधील असल्याबाबतचे शपथपत्र. (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर) |
| २२ | | निविदा फॉर्म व शुध्दीपत्रके (असल्यास) निविदाकाराच्या स्वाक्षरीसह. |
| २३ | | मागील ५ वर्षामध्ये शासकीय/निमशासकीय कार्यालयामार्फत काळ्या यादीमध्ये समाविष्ट केले नसल्याचे तसेच बयाना रक्कम/सुरक्षा ठेव/अनामत रक्कम जप्त करण्यात आली नसल्याचे/करण्यात आलेला करारनामा रद्द करण्यात आला नसल्याचे शपत्रपत्र. (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर) |
| २४ | | वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणार नाही, या आशयाचे शपथपत्र. |
| २५ | | वरील कागदपत्रांव्यतिरिक्त निविदाकाराची क्षमता व तांत्रिक अर्हता अधिक सक्षमपणे पडताळणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे राज्यस्तरीय समिती निश्चित करेल. सदरची कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करणे अनिवार्य राहील. |

७.५.१ उपरोक्त कागदपत्रांच्या सूचीतील सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती निविदाकारास निविदा प्रक्रीया समितीच्या सूचनेनुसार खातरजमा करण्यासाठी सादर कराव्या लागतील, अन्यथा निविदाकारास अपात्र ठरविण्यात येईल.

७.५.२ निविदाकाराने तांत्रिक अर्हतेमध्ये काळजीपूर्वक परिपूर्ण कागदपत्रे सादर करावीत. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर तांत्रिक अर्हतेबाबत कोणतीही कागदपत्रे नव्याने सादर करण्याची संधी दिली जाणार नाही. तथापि, कागदपत्रांची अस्पष्टता/संधिग्ततेबाबत निविदा प्रक्रीया समिती निविदाकारास मूळ कागदपत्रे घेऊन कागदपत्रे पडताळणी/खुलासा करण्यासाठी बोलवेल. यामध्ये निविदा प्रक्रीया समितीचा निर्णय अंतीम राहील.

७.६ इतर निविदाकाराच्या तांत्रिक अर्हतेबाबत हरकत असल्यास, सदरची हरकत तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर ३ दिवसाच्या आत पुराव्यानिशी नोंदवावी. विहित मुदतीनंतर नोंदविण्यात आलेली हरकत विचारात घेण्यात येणार नाही.

७.७ निविदेमध्ये कोणतीही अट अथवा पर्याय निविदाकारास देता येणार नाही. अशा अटीयुक्त निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

## (८) <u>निविदा मंजुरीचे प्राधिकार व कार्यपद्धती:-</u>

८.१ निविदा प्रक्रिया समितीमार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रीयेस व निवड करण्यात आलेल्या निविदाकाराच्या प्रस्तावास अंतीम मंजूरी देण्याचे अधिकार खालीलप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या **राज्यस्तरीय समितीस** असतील.

### ८.२ <u>राज्यस्तरीय समितीः-</u>

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, अनापु व ग्रासंवि, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २ | सह सचिव/उप सचिव (कार्यासन नापु-१६ अ), अनापु व ग्रासंवि, मंत्रालय, मुंबई. | सदस्य सचिव |
| ३ | नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई. | सदस्य |
| ४ | सह सचिव/उपसचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ५ | सह सचिव/उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | सह सचिव/उपसचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ७ | उपायुक्त (पुरवठा), कोकण विभाग. | सदस्य |
| ८ | उद्योग सहसंचालक (भांख), उद्योग संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ९ | वित्तिय सल्लागार व उप सचिव, अनापु व ग्रासंवि, मुंबई. | सदस्य |

८.३ राज्यस्तरीय समिती निविदा प्रस्तावाचा सांगोपांग अभ्यास करून त्यानंतर अंतिम निविदांना मान्यता देईल.

## (९) निविदेतील दरांची विधीग्राह्यता :-

९.१ निविदाकाराने शासन निर्णयातील अन्नधान्य वाहतूकीच्या व यांत्रिकी पद्धतीने अन्नधान्य हाताळणूकीच्या सर्व तरतूदी लक्षात घेवून निविदेत दर नमूद करावेत. मागाहून दरातील बदलाबाबतची विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.

९.२ सर्व निविदाकारांची दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून १२० दिवस विधीग्राह्य राहतील.

९.३ मात्र या कालावधीमधून निविदा प्रक्रियेबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यासाठी लागणारा कालावधी वगळण्यात येईल.

**(१०) <u>वाटाघाटीसाठी मार्गदर्शक सूचना:-</u>**

१०.१ स्पर्धात्मक निविदा आल्यानंतर वाटाघाटी करण्यास कोणत्याही परिस्थितीत प्रोत्साहन देण्यात येऊ नये. वाटाघाटींमुळे बाजारात चुकीचे संदेश जातात आणि त्यामुळे निविदा यंत्रणेबाबत साशंकता निर्माण होऊ शकते. त्यामुळे L-१ व्यतिरिक्त कोणत्याही निविदाकारासोबत वाटाघाटी करण्यात येऊ नयेत. तथापि, L-१ निविदाकाराबरोबर फक्त खालील परिस्थितीमध्ये राज्यस्तरीय समितीमार्फत वाटाघाटी करता येतील.

१०.१.१ जर दर असमर्थनीय असतील किंवा बाजारातील भावांपेक्षा जास्त असतील तर,

१०.१.२ जर निविदाकरांनी संघ (कार्टेल) स्थापन केला असल्याचा संशय असेल तर,

१०.१.३ जर निविदा प्रक्रीयेत कमीतकमी ३ वैध व्यापारी निविदांचे मुल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर.

१०.२ वाटाघाटींचा गैरवापर केला जाऊ नये. L-१ निविदाकाराबरोबर संशयास्पद हेतूने वाटाघाटी केल्यास त्याच्या परिणामस्वरुप निर्णय घेण्यास विलंब होऊ शकतो. वाटाघाटीसाठी शिफारस करणाऱ्या प्राधिकाऱ्याने खात्री पटेल अशी कारणे नमूद करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत निविदांना त्यांच्या वैधता कालावधीमध्येच अंतिम स्वरुप देण्यात येईल, याची काळजी घेण्यात यावी.

१०.३ वाटाघाटी या व्यक्तींनी न करता त्या राज्यस्तरीय समितीने कराव्यात. वाटाघाटी प्रक्रीयेची कागदपत्रे जतन करण्यात यावीत. निविदाकाराने त्याचा वाटाघाटी नंतरचा देकार राज्यस्तरीय समितीपुढे लेखी सादर करावा.

**(११) करारनामा:-**

११.१ शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी लेखी सूचना दिल्यापासून ०५ कार्यालयीन दिवसात रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात नोंदणीकृत करारनामा करणे अनिवार्य आहे. याकरिता शासनाच्या संबंधित विभागाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे. काही तांत्रिक अडचणींमुळे ०५ कार्यालयीन दिवसात करारनामा न झाल्यास याकरिता अधिकचा कालावधी देण्याचा अधिकार शासनास राहील.

११.२ या शासन निर्णयानुसार जाहीर निविदा प्रक्रिया राबवून निविदा मंजूर करण्यात आलेल्या निविदाकारासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यास या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील, असे करारनाम्यात नमूद करण्यात यावे.

११.३ करारनाम्यावर जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी/नियंत्रक, शिधावाटप/उपनियंत्रक शिधावाटप व निविदाकार यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

११.४ करारनाम्याच्या प्रत्येक पानावर तसेच दुरुस्तीच्या ठिकाणी जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी/नियंत्रक, शिधावाटप/उपनियंत्रक, शिधावाटप व निविदाकार यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

११.५ मंजूर निविदाकाराने विहित मुदतीत करारनामा करण्यास नकार दिल्यास किंवा करारनामा करण्यास टाळाटाळ केल्यास, अशा निविदाकाराची संपूर्ण बयाना/इसारा रक्कम जप्त करून नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशा फेरनिविदा प्रक्रियेत पहिल्या निविदेत करारनामा करण्यास नकार देणाऱ्या न्यूनतम निविदाकारास एक वर्षासाठी प्रतिबंधित करावे.

११.६ निविदा सादर केल्यानंतर निविदाकार हा निविदेच्या तसेच करारनाम्यातील तरतूदींना बांधील राहिल. न्यूनतम दर असलेल्या निविदाकाराने करारनामा करण्यास नकार दिल्यास अथवा टाळाटाळ केल्यामुळे अथवा आदेश देवूनही काम न केल्यास, शासनाने खर्च करावयाची अतिरिक्त रक्कम, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पी. एल. आर. (Prime Lending Rate) अधिक दोन टक्के व्याजासह निविदाकाराकडून वसूल करावी.

११.७ खाजगी संस्था (कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी असलेली)/फर्म/भागिदारी संस्था (पार्टनरशिप फर्म)/सहकारी संस्था/सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा अंतर्गत नोंदणी असलेली विश्वस्त संस्था यांचे निविदा भरतेवेळी जे विश्वस्त/संचालक/भागीदार/प्रोप्रायटर आहेत, ते शासनाने केलेला करारनामा संपुष्टात येईपर्यंत कायम ठेवावे लागतील/बदलता येणार नाही. निविदा सादर केल्यापासून ते करारनामा कालावधी संपुष्टात येईपर्यंत विश्वस्त/संचालक/भागीदार/प्रोप्रायटर बदलावयाचे असल्यास शासनाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील.

## (१२) <u>कंत्राट कालावधी व मुदतवाढः-</u>

१२.१ निविदा प्रक्रियेद्वारे जी निविदा अंतिम होईल, त्या निविदाकारासोबत **पाच वर्षाच्या** कालावधीकरिता वाहतूक करारनामा करण्यात येईल. निविदाकाराशी ज्या तारखेस करारनामा करण्यात येईल, त्या तारखेस कंत्राटाचा कालावधी सुरु होऊन तो पुढील पाच वर्षापर्यंत असेल.

१२.२ नवीन कंत्राट राबविण्याची प्रक्रीया शासनस्तरावरून सुरू करण्याकरिता जुने कंत्राट संपण्यापूर्वी कमीत कमी ६ महिने आधी जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधवाटप यांच्याकडून संबंधित वाहतूकदाराचा कार्यमूल्यमापन अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

१२.३ कंत्राट कालावधी संपल्यानंतर सुध्दा जर काही अपरिहार्य परिस्थितीमुळे किंवा न्यायालयीन प्रकरणामुळे नवीन कंत्राट निश्चित करता आले नाही तर, कंत्राटाचा कालावधी २ महिन्यांपर्यंत वाढविण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांना राहील.

१२.४ वाढीव २ महिन्यांच्या कालावधीनंतरही काही अपरिहार्य कारणांस्तव पुढील कालावधीकरिता कंत्राट निश्चित करणे शक्य न झाल्यास, पुढील कंत्राटाचा कालावधी वाढविण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावरून घेण्यात येईल. त्यासाठी जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी त्यांच्या स्तरावरील २ महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी किमान १५ दिवस अगोदर आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करावा.

१२.५ मुदतवाढीमध्ये करारनामा करताना तेवढ्या कालावधीचे मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे.

**(१३) निविदा मंजूरी पश्चात जिल्हा पुरवठा/नियंत्रक, शिधावाटप कार्यालयाच्या जबाबदाऱ्या: -**

१३.१ वाहतूक निविदा अंतिम झाल्यानंतर वाहतूक कंत्राटदाराकरिता अन्नधान्य वाहतुकीचे मार्ग Route Optimization नुसार निश्चित करुन देण्यात यावेत. त्यानुषंगाने भारतीय अन्न महामंडळाच्या संबंधित कार्यालयांशी वेळोवळी समन्वय साधून वाहतूक मार्ग सुनिश्चित करावेत. तसेच याबाबत अन्नचक्र पोर्टलद्वारे वाहतूक मार्ग निश्चित करून घ्यावेत.

१३.२ एकाच मार्गावरील शिधावाटप दुकानांची परमिटे एकत्रित देण्यात यावीत. यासाठीचे आवश्यक ते आगाऊ नियोजन जिल्हा पुरवठा/उप नियंत्रक, शिधावाटप कार्यालयामार्फत करण्यात यावे. एकाच मार्गावर गाडी पूर्ण क्षमतेने जाईल व त्या मार्गावरील सर्व रास्त भाव दुकानदारांना पर्याप्त अन्नधान्य उपलब्ध होईल, याची खात्री करावी. मार्गांचे व फेऱ्यांचे नियोजन चोख केल्यास, सदर पद्धत वाहतूकदाराच्या तसेच अंतिमत: शासनाच्या फायद्याची होईल, ही बाबदेखील जिल्हा पुरवठा कार्यालयाने ध्यानात घ्यावी.

१३.३ भारतीय अन्न महामंडळाचे गोदाम ते रास्त भाव दुकान यामधील अंतर हे दोन टप्प्याच्या वाहतूकीच्या अंतरापेक्षा (FCI गोदाम ते तालुका गोदाम आणि तालुका गोदाम ते रास्त भाव दुकान या अंतरापेक्षा) कमी असल्याची जिल्हा पुरवठा/नियंत्रक, शिधावाटप, मुंबई यांची खात्री झाल्यास, अशा रास्त भाव दुकानांसाठी दोन टप्प्याच्या वाहतूकीऐवजी थेट वाहतूक करण्यात यावी.

१३.४ जिल्हा पुरवठा कार्यालयाचे धान्य उचल प्रतिनिधी यांनी संबंधित भारतीय खाद्य निगम येथून थेट/पहिल्या टप्प्याची वाहतुक करण्याकरीता संबंधित शासकीय गोदामात पाठविण्यांत आलेल्या वाहनांबाबत स्टेटमेंट-२ हे त्याच दिवशी जिल्हा पुरवठा कार्यालय व संबंधित तालुका कार्यालयास महितीस्तव सादर करावे. तालुका कार्यालयातील संबंधित निरीक्षण अधिकारी/पुरवठा निरीक्षक यांनी स्टेटमेंट-२ नुसार आपल्या तालुक्यात पोहोच होणाऱ्या अन्नधान्याची वाहतूक होणाऱ्या वाहनांवर GPS यंत्रणेव्दारे सनियंत्रण ठेवावे. तसेच याबाबतचा अहवाल त्याच दिवशी जिल्हा पुरवठा कार्यालयास सादर करावा. दुसऱ्या टप्प्याच्या वाहतूकीवरदेखील GPS यंत्रणेव्दारे सनियंत्रण ठेवावे व याबाबतचा अहवाल त्याच दिवशी जिल्हा पुरवठा कार्यालयास सादर करावा.

१३.५ वाहतूक खर्चात बचत होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व शासकीय गोदामापर्यंतची/रास्त भाव दुकानापर्यंतची वाहतूक जवळच्या भारतीय अन्न महामंडळाच्या बेस डेपोतून करण्यात यावी.अशा जवळच्या बेस डेपोमधून संबंधित शासकीय गोदामाकरिता भारतीय अन्न महामंडळाकडून जिल्हा प्रशासनाने नियतन प्राप्त करून घ्यावे. विपरीत परिस्थितीमध्ये सुद्धा भारतीय अन्न महामंडळाच्या नियमीत गोदामातूनच नियतन प्राप्त होईल, याबाबत जिल्हा प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत. भारतीय अन्न महामंडळाच्या जिल्ह्याबाहेरील गोदामातून नियतन आदेश देण्याची वेळ येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. याउपरही भारतीय अन्न महामंडळाच्या नियमीत गोदामा व्यतिरीक्त अन्य गोदामातून नियतन आदेश देण्याची वेळ आल्यास अशा प्रसंगी शासनाची पूर्वपरवानगी घेऊन मगच नियतन आदेश काढावेत.

१३.६ बेस डेपोवरुन मिळणाऱ्या धान्याचे वजन करुन देण्याची जबाबदारी भारतीय अन्न महामंडळाची आहे. तथापि, वजनकाटा नादुरुस्त झाल्याप्रकरणी उप नियंत्रक/जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी वाहतूकदाराच्या समन्वयाने वजनकाटे दुरूस्त करून घेण्यात यावेत.

वजनकाटा नादुरुस्त प्रकरणी अतिरिक्त रक्कम राज्य शासन/विभागाकडून देय राहणार नाही.

१३.७ वाहतूक कंत्राटदाराने उपलब्ध करुन दिलेल्या मालकीच्या/नियंत्रणाखालील/अतिरिक्त वाहनांची परराज्यात नोंदणी झालेली असल्यास, सदरच्या वाहनांना कंत्राट कालावधीत महाराष्ट्र राज्यात वाहतूक करण्यास परिवहन खात्याने परवानगी दिली असल्याची कागदपत्रे वाहतूक कंत्राटदाराने निविदेसोबत सादर करावीत.

१३.८ शासकीय धान्य गोदामामध्ये धान्य भरुन आलेले वाहन २४ तासांच्या आत (सुट्टीचे दिवस वगळून) रिकामे करुन देण्याची जबाबदारी संबंधित गोदामपालाची राहील. शासकीय धान्य गोदामामध्ये आलेल्या वाहनातील धान्य २४ तासांच्या आत उतरविले गेले नाही, तर वाहनातील धान्यासाठी प्रती मे.टन रु.५०/- इतक्या दंडात्मक वसुलीची कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा पुरवठा कार्यालयाची राहील. त्यासाठी जे घटक जबाबदार असतील त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करुन दंड वसुली करण्यात यावी.

१३.९ स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य भरुन आलेले वाहन तात्काळ (सुट्टीचे दिवस धरून) उतरवून करुन घेण्याची जबाबदारी संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराची राहील. स्वस्त धान्य दुकानामध्ये आलेल्या वाहनातील धान्य तात्काळ उतरविले गेले नाही, तर संबंधित स्वस्त धान्य दुकानदार कारवाईस पात्र राहील.

१३.१० करारनामा करतेवेळी कंत्राटदाराने सादर केलेल्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांच्या यादी व्यतिरिक्त कंत्राटदाराने वाहतुकीकरीता अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन दिल्यास, अशा वाहनांच्या नोंदणी क्रमांकासह यादीस जिल्हाधिकारी स्तरावरून लेखी मान्यता दिल्यानंतर या वाहनांची यादी वेळोवेळी जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी. मुंबई शिधावाटप क्षेत्रासाठी अतिरिक्त वाहनांना मंजूरी देण्याची कार्यवाही उपनियंत्रक, शिधावाटप हे देखील करु शकतील. वाहनांची मंजूर केलेली मूळ यादी तसेच वेळोवेळी मंजूर केलेली अतिरिक्त वाहनांची यादी यांच्या आदेशाच्या प्रती उपनियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत शासनास न चुकता सादर करण्यात याव्यात. शासकीय वाहतूक प्रतिनिधी तसेच गोदामापाल यांनी अशा वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांमध्ये धान्य भरून देऊ नये.

१३.११ थेट वाहतूकीदरम्यान भारतीय अन्न महामंडळ, वाहतूक मार्ग, रास्त भाव दुकाने इत्यादीबाबत/इत्यादी ठिकाणी येणाऱ्या अडचणींविषयी वाहतूक कंत्राटदार व उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी समन्वय साधून उपायोजना कराव्यात.

१३.१२ किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धानाच्या भराडई अंती प्राप्त होणार CMR ५० किलो + ५८० ग्राम (बारदान्याचे वजन) = ५०.५८० किलो याप्रमाणे जमा करण्याची जबाबदारी गिरणीधारकाची आहे. यामुळे सदर CMR संबंधित गोदामपालाने गोदामात स्वीकारताना प्रमाणीकरण न करता केवळ वजन करून स्वीकारण्यात यावा. धानाच्या प्रमाणात CMR चे वजन कमी भरल्यास त्याची नियमाप्रमाणे वसूली गिरणीधारकाकडून करण्यात यावी. याउपरही सीएमआरचे प्रमाणीकरण होत असल्याची बाब निदर्शनास आल्यास, त्यावर होणाऱ्या खर्चाची वसूली संबंधित जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांच्या वेतनातून करण्यात यावी.

१३.१३ **पुरवठा साखळी व्यवस्थापन यंत्रणेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सूचनाः** विभागाने पुरवठा साखळी व्यवस्थापन यंत्रणेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व पर्यायाने लाभार्थ्यांना विहित कालावधीत अन्नधान्याचा पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून दि.१८.०५.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये तसेच त्यानंतर वेळोवेळी शासनामार्फत सूचना निर्गमित केलेल्या आहेत. या सूचनांची अंमलबजावणी जिल्हा पुरवठा कार्यालये/तालुका पुरवठा कार्यालये/नियंत्रक/उपनियंत्रक, शिधावाटप कार्यालयांकडून गांभीर्याने करावयाची आहे. याकरिता, या सूचना पुन्हा एकदा पुढीलप्रमाणे उद्धृत करण्यात येत आहेत:-

१३.१३.१ सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी नियतनाच्या महिन्याच्या आधीच्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात (किमान एक महिना आधी) भारतीय अन्न महामंडळाकडून वितरण आदेश (DO) प्राप्त करुन घ्यावेत. त्यासाठीची कार्यवाही त्या आधीच्या आठवड्यात पूर्ण करावी व तात्काळ उचल सुरु करावी. (उदा. जानेवारी महिन्याच्या नियतनाच्या उचलीचे वितरण आदेश डिसेंबर महिन्याच्या १ तारखेला मिळालेले असणे आवश्यक आहे, त्यासाठी नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात भारतीय अन्न महामंडळाकडे जानेवारी महिन्याच्या नियतनाची रक्कम जमा करणे आवश्यक आहे.)

१३.१३.२ सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी नियतनाच्या महिन्याच्या आधीच्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत भारतीय अन्न महामंडळाकडील संपूर्ण नियतनाची उचल होऊन ते धान्य जिल्ह्याच्या शासकीय गोदामांमध्ये जमा झाल्याची खातरजमा करावी.

१३.१३.३ शिधावाटप कार्यालये/तालुका पुरवठा कार्यालयांनी नियतनाच्या महिन्याच्या आधीच्या महिन्याच्या २० तारखेपर्यंत शिधावाटप दुकानदारांकडून परमीटच्या रकमा (असल्यास) जमा करुन घेण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावी.

१३.१३.४ दुसऱ्या टप्प्याच्या वाहतुकीचे योग्य रितीने नियोजन होण्याच्या दृष्टीने नियतनाच्या महिन्याच्या आधीच्या महिन्याच्या २१ तारखेपासून दुसऱ्या टप्प्याच्या वाहतुकीचे पास वाहतुकदारांना दररोज वितरीत करावेत व वाहतूक कार्यान्वित करावी. वाहतूक पास वितरीत करताना ते झोननुसार करण्यात येतील याची दक्षता घेण्यात यावी.

१३.१३.५ नियतनाच्या महिन्याच्या ७ तारखेपर्यंत सर्व शिधावाटप दुकानांना १०० टक्के धान्याचे वितरण पूर्ण करण्यात यावे.

१३.१३.६ त्याचप्रमाणे केंद्र शासनाने काही आपत्कालीन परिस्थितीत अन्नधान्याची आगाऊ वाहतूक करण्याच्या सूचना केल्यास, त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या समन्वयाने अन्नधान्य उचलीचे नियोजन करावे व अन्नधान्याची उचल विहीत वेळेत होईल, याची खबरदारी घ्यावी.

१३.१३.७ जे जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक, शिधावाटप/तहसिलदार हे उपरोक्त वेळापत्रकानुसार धान्याची उचल तसेच वितरण करणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

१३.१३.८ उपरोक्त वेळापत्रकामध्ये आवश्यकतेनुसार शासन स्तरावरून बदल/सुधारणा करण्यात येतील.

**(१४) <u>तालुका शासकीय गोदामातील अन्नधान्य हाताळणूकीव्यतिरिक्त उर्वरित ठिकाणी होणाऱ्या अन्नधान्य हाताळणूकीबाबत सूचना:-</u>**

१४.१ जिल्ह्यातील ज्या ठिकाणी थेट वाहतूक सुरू आहे किंवा नजीकच्या काळात थेट वाहतूक सुरू झाल्यास, थेट वाहतुकीदरम्यान होणारी तसेच रास्त भाव दुकानावरील अन्नधान्य हाताळणूकीची कामे वाहतूकदाराकडून Conveyor Automation Belt किंवा इतर आवश्यक स्वयंचलित यंत्रणा वापरून करणे बंधनकारक राहील.

१४.२ सदर हाताळणूकीसाठी यांत्रिकीकरणाकरिता लागणारा खर्च वाहतूकदाराकडून करण्यात येईल. याकरिता वाहतूकदारास कोणत्याही अतिरिक्त खर्चाची मागणी शासनाकडे करता येणार नाही. वाहतूक निविदा दर भरताना या सर्व बाबींचा विचार करून त्यांनी दर भरावेत.

**(१५) <u>वाहतूक कंत्राटदाराच्या जबाबदाऱ्या:-</u>**

१५.१ वाहतूक कंत्राटदारास वाहतूकीस उपयोगात आणावयाच्या वाहनांवर **"लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था, महाराष्ट्र शासन"** असे ठळक अक्षरात लिहावे लागेल.

१५.२ जिल्ह्यातील/परिमंडाळातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण पूर्ण होईपर्यंत कंत्राटदारास मालकीच्या व नियंत्रणाखालील सर्व वाहनांना (संपूर्ण वाहनांस) शासनाने निश्चित केलेला रंग द्यावा लागेल व वाहनांना स्वखर्चाने सीसीटिव्ही कॅमेरे व त्याची रेकॉर्डींग क्षमता, जी.पी.एस. प्रणाली, लोड सेल, ईलेक्ट्रॉनिक वजनकाटा बसवावा लागेल, त्याच्या संनियंत्रणाची सुविधा जिल्हा पुरवठा/उप नियंत्रक शिधावाटप कार्यालयास उपलब्ध करून द्यावी लागेल. वाहतूकीसाठी उपलब्ध करुन दिलेल्या तात्पुरत्या अतिरिक्त वाहनांना रंग देणे आवश्यक नसेल, मात्र सीसीटिव्ही कॅमेरे व त्याची रेकॉर्डींग क्षमता, जी.पी.एस. प्रणाली, लोड सेल, ईलेक्ट्रॉनिक वजनकाटा यंत्रणा बसविलेली असणे बंधनकारक राहील. जिल्हा पुरवठा/उप नियंत्रक, शिधावाटप कार्यालयाने या जीपीएस यंत्रणेचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा पुरवठा/उप नियंत्रक, शिधावाटप कार्यालयामध्ये संनियंत्रण कक्षाची निर्मिती करावी, त्यासाठी सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी दर्जाच्या जबाबदार अधिकाऱ्याची निवड करुन हे संनियंत्रण रोज होईल याची खातरजमा करावी.

१५.३ सीएमआर वाहतूकीकरिता वापरण्यात येणाऱ्या गाड्यांची यादी वाहतूकदार संबंधित वाहतूक प्रतिनिधीस सादर करेल. सदर वाहनांना जी.पी.एस. प्रणाली असल्याची खात्री करून संबंधित वाहतूक प्रतिनिधी सदर यादी सीएमआर वाहतूक करावयाच्या जिल्हा पुरवठा कार्यालयास ई-मेलद्वारे सादर करेल. सदर यादीस जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तात्काळ (२ तासात) मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

१५.४ अट क्र.१५.२ व १५.३ चे उल्लघंन केल्याचे निदर्शनास आल्यास वाहतूकदारास प्रथम दोन वेळा समज देण्यात येईल. तद्नंतरसुध्दा उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार शासनाचा राहील.

१५.५ लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याचे नियतन केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होत असते. सदर नियतनामध्ये काही महिन्यात अतिरिक्त नियतन प्राप्त होते. यामुळे जिल्ह्याच्या नियतनानुसार प्रत्येक महिन्यात अधिक/कमी अन्नधान्य नियतनाची वाहतूक करावी लागेल.

१५.६ अन्नधान्याच्या वाहतुकीकरीता प्रमाणित केलेल्या जवळच्या मार्गाव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने अथवा आडमार्गाने धान्याची वाहतूक करण्यात येवू नये. आपत्कालीन परिस्थितीत (उदा. नैसर्गिक आपत्ती, अपघात, स्थानिक जत्रा, आंदोलने इ.मुळे) नियोजित मार्गाव्यतिरिक्त अन्य पर्यायी मार्गाने वाहतूक करावी लागल्यास कंत्राटदारास जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांची लेखी परवानगी घ्यावी लागेल. अशी लेखी परवानगी न घेता वाहतूक केल्यास, या वाढीव अंतराकरिता वाहतूक कंत्राटदारास शासनाकडून कोणतीही अतिरिक्त रक्कम देय राहणार नाही.

१५.७ शासन/जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी आदेशित केल्यास शासनाच्या इतर योजनेंतर्गतच्या अन्नधान्याच्या वाहतूकीचे कामसुध्दा त्यास मंजूर दरांमध्ये करावे लागेल.

१५.८ निविदाकारांकडे आवश्यक असलेल्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांची किमान वहन क्षमता (वेळोवेळी सुधारीत केलेल्या वहनक्षमतेनुसार) निश्चित करण्यात आली असली तरी धान्याची वाहतूक विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी व त्यासाठी आवश्यक असल्यास अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन काम पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक कंत्राटदाराची असेल.

१५.९ कंत्राटदारास उपकंत्राटदाराची नियुक्ती करता येणार नाही.

१५.१० कंत्राटदाराने त्यांच्या विश्वासातील प्रतिनिधी, परवानाधारक (Driving licence) वाहन चालक, वाहक यांची नेमणूक करावी.

१५.११ वाहन वापराबाबत आणि वाहनभार क्षमता, वाहनांचे कर, विमा, प्रदुषण, चालक, मदतनीस, वाहतूक प्रतिनिधी यांचा विमा, किमान वेतन इ. बाबत शासनाच्या अस्तित्वात असलेल्या सर्व नियमांचे पालन करण्यास कंत्राटदार बांधील राहील. त्याबद्दल संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचा निर्णय अंतीम राहील.

१५.१२ १५.१० व १५.११ मध्ये नमूद कर्मचाऱ्यांचे वेतन, सेवा इत्यादीबाबत न्यायालयामध्ये दाखल होणाऱ्या दाव्यांबाबतची सर्वस्वी जबाबदारी वाहतूक कंत्राटदाराची राहील.

१५.१३ भारतीय अन्न महामंडळाच्या (FCI) बेस डेपो वरुन वाहतूक कंत्राटदाराच्या वाहनामध्ये धान्याच्या पोत्यांची थप्पी लावून देण्याची (Countable Position) संपूर्ण जबाबदारी भारतीय अन्न महामंडळाची राहील. त्यासाठी कोणताही अधिकचा खर्च (वाराई इत्यादी) वाहतूक कंत्राटदार करणार नाहीत.

१५.१४ धान्याचा अपहार/गळती होऊ नये म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन शासन करित आहे, त्यामध्ये वाहनांना CCTV व GPS यंत्रणा, Geo Mapping, लोड सेल यंत्रणा बसविणे, पुरवठा साखळी यंत्रणेची अंमलबजावणी करणे, Conveyor Automation Belt इ. उपाययोजना समाविष्ट आहेत. शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक ती उपकरणे वाहनांवर बसविणे वाहतुकदारांस बंधनकारक असेल. सदर उपकरणे वाहतूकदारास स्वखर्चाने बसवावी लागतील.

१५.१५ Conveyor Automation Belt कायमस्वरूपी सुस्थितीत राहील याची खबरदारी संबंधित वाहतूक कंत्राटदार यांची राहील. Conveyor Automation Belt साठी बॅटरी बॅकअपची सुविधा स्वखर्चाने करण्याची जबाबदारी संबंधित वाहतूकदाराच्या राहील.

## (१६) देयकांची अदायगी: -

१६.१ वाहतूक कंत्राट कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर सुरूवातीच्या काही कालावधीकरिता दोन टप्प्यांमध्ये वाहतूक करावी लागणार असली तरी सदर वाहतूकीची देयके ही प्रत्यक्ष थेट वाहतूकीच्या अंतरानुसार (भारतीय अन्न महामंडळाचे गोदाम ते रास्त भाव दुकान यामधील अंतर) परिगणीत करून करण्यात यावीत.

१६.२ प्रत्यक्ष वाहतूकीचे अंतर हे Route Optimization किंवा गुगल मॅपवरील अंतरानुसार ग्राह्य धरण्यात यावे. याव्यतिरिक्त इतर पद्धत वापरून वाढीव अंतरामुळे अतिप्रदान झाल्यास याची जबाबदारी उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

१६.३ कंत्राटदाराने अन्नधान्य वाहतूकीची तसेच अन्नधान्य हाताळणूकीची देयके महिना संपल्यावर पुढील महिन्याच्या १५ तारखेच्या आत उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा कार्यालयास सादर करावीत.

१६.४ वाहतूक कंत्राटदारांकडून देयके सादर झाल्यावर जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांनी या देयकांची छाननी ७ दिवसात पूर्ण करावी. छाननी दरम्यान काही कागदपत्रांची पूर्तता होण्याची आवश्यकता असल्यास, ऑनलाईन नोंदी व वाहतूक पासाच्या आधारे/टोल नाक्यांच्या पावत्यांच्या/FasTag Statement आधारे धान्य पोहोचल्याची खातरजमा करून घेऊन ७० टक्के देयकांची अदायगी जिल्हा पुरवठा अधिकारी/उप नियंत्रक, शिधावाटप यांनी करावी. कंत्राटदाराकडून सादर केलेल्या देयकांमध्ये त्रुटी आढळल्यास, सर्व त्रुटी एकाचवेळी कंत्राटदारास कळविण्यात याव्यात. वारंवार त्रुटी काढणे टाळावे. तसेच त्रुटींची पूर्तता तात्काळ करून घ्यावी. प्राप्त झालेली देयके पडताळणीअंती परिपूर्ण आढळून आल्यास देयकाची सर्व रक्कम जिल्हा पुरवठा अधिकारी/उप नियंत्रक शिधावाटप यांनी जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांचे मान्यतेने ७ दिवसात अदा करावी.

१६.५ वाहतूक पास (Transport Pass-TP) मध्ये एकूण वजनातून बारदाणा/गोणीचे वजा केलेल्या वजनाचे स्वतंत्रपणे देयक करारनाम्यातील धान्य वाहतूक दराने अदा करण्यात येईल.

१६.६ वाहतुकीच्या ज्या टप्प्याची जितकी क्विंटल वाहतूक झाली असेल तसेच जेवढ्या परिमाणाची अन्नधान्य हाताळूणक झालेली असेल, त्याच्या मंजुर दरांनुसार देयकांची अदायगी प्रचलित प्रणाली नुसार करण्यात यावी.

१६.७ केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार, कंत्राटदाराच्या देयकातून आयकर तसेच, इतर सर्व शासकीय अनिवार्य वजाती वसूल केल्यानंतरच देयकांची अदायगी करावी.

१६.८ भारत सरकारकडून जारी करण्यात आलेल्या विद्यमान जीएसटी कायदे व अधिसूचनांनुसार, अन्नधान्य वाहतूक व हाताळणी सेवांवर वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू असल्यास आकारला जाईल.भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या दि.०८.१०.१९९३ च्या परिपत्रकातील परि.क्र.५.३ नुसार सर्व प्रकारच्या कंत्राटांना आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १९४ (सी) च्या तरतुदी लागू आहेत. त्यानुसार वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्याकडील परिपत्रक क्र.का-१/३९८/७९२२, दि.०९.१२.१९९६ अन्वये केंद्रशासनाच्या प्रचलीत नियमानुसार आयकर कपात करण्यात यावी.

१६.९ आयकर वजाती प्रमाणपत्र (TDS) संबंधित कंत्राटदारास तात्काळ देण्यात यावे.

१६.१० या शासन निर्णयातील कोणत्याही तरतुदीमुळे वाहतुकदारास देय होणाऱ्या रकमेमध्ये वाढ/घट होत असल्यास, अशी बाब वाहतुदाराने शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी. अशी बाब विहित कालावधीत निदर्शनास आणून न दिल्यास, तद्नंतर याबाबत अतिरिक्त देयक मागणीची कोणतीही विनंती विचारात घेण्यात येणार नाही.

**(१७) <u>ट्रक लोडिंग बाबत दक्षता: -</u>**

१७.१ वाहन चालकाने कंत्राटदाराचे लेटर हेडवर विशिष्ट ट्रक भरुन घेण्याबाबतचे प्राधिकारपत्र सादर केल्यानंतरच ट्रक भरुन देण्यात यावा. जिल्हाधिकारी यांच्या प्रतिनिधीने व गोदाम व्यवस्थापक/गोदामपाल यांनी ट्रकच्या नंबर प्लेटवरील नोंदणी क्रमांक व विहित नमुन्यातील प्राधिकारपत्र व त्यावरील ट्रकचा नोंदणी क्रमांक याच्या खरेपणाची खातरजमा करून घ्यावी.

१७.२ वाहन चालकाचा परवाना व त्यावरील फोटो याची काळजीपूर्वक तपासणी करुन वाहन चालक म्हणून हजर असलेली व्यक्ती व प्राधिकारपत्रात नमूद केलेली व्यक्ती एकच असल्याची खातरजमा करावी.

१७.३ वरील बाबींचा उल्लेख करुन विहित नमुन्यातील प्राधिकारपत्र कंत्राटदाराकडून भरुन घेण्यात यावे.

१७.४ शासन पत्र क्र:कंत्राट-११२०/प्र.क्र.१०६/नापु१६-अ, दि.०५.०२.२०२६ व त्यासोबतच्या सहपत्रान्वये कळविल्यानुसार, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत, लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये अन्नधान्याची वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये, त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त अन्नधान्य न भरण्यासंदर्भात भारतीय अन्न महामंडळाच्या मार्गदर्शक सूचना तसेच मोटार वाहन कायद्यातील तरतूदींचे पालन करणे अनिवार्य आहे.

१७.५ शासन पत्र दि.०१.०९.२०१८ अन्वये कळविल्यानुसार केंद्र शासनाच्या दि.१६.०७.२०१८ व दि.०६.०८.२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दि.२१.०८.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये वाहन भार क्षमतेमध्ये सुधारणा करण्याची कार्यपध्दती तपशीलवारपणे विहित केली आहे. त्यानुसार वाहनांच्या कमाल वाहनभार क्षमतेमधील वाढ लागू राहील.

१७.६ वाहतूकदार वाहनभार क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करत असल्याचे परिवहन विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास, संबंधित वाहतूकदारावर नियमोचित दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

१७.७ वाहनभार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणार नाही, अशा आशयाचे शपथ पत्र निविदेसोबत निविदाकाराने सादर करणे बंधनकारक राहील.

**(१८) कंत्राटदाराने अन्नधान्य व्यपगत केल्यास करावयाची कारवाई: -**

१८.१ जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी नियतन महिन्याच्या धान्य उचलीचे नियतन आदेश (डी.ओ.) कोणत्याही परिस्थितीत ४० दिवस आधी काढावेत, जेणेकरुन कंत्राटदारास धान्याची उचल करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळून धान्याची उचल सुरळीत करता येईल.

१८.२ यासंदर्भात परि.क्र.१३ मध्ये तपशीलवार सूचना देण्यात आलेल्या आहेत, त्यांचे अचूक पालन करण्यात यावे.

१८.३ वाहतुकीच्या पहिल्या टप्प्यात अथवा थेट वाहतुकीदरम्यान विहित मुदतीत अन्नधान्याची उचल न केल्यामुळे व्यपगत झालेल्या अन्नधान्याच्या बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या १० टक्के रक्कम दंड म्हणून वाहतूक कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

१८.३.१ वाहतुकीच्या दुसऱ्या टप्प्यात अन्नधान्याचे वितरण नियतनाच्या महिन्याच्या ७ तारखेपर्यंत व जास्तीत जास्त १४ तारखेपर्यंत न केल्यास, शिधावाटप दुकानांपर्यंत न पोहोचलेल्या अन्नधान्याच्या बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या १० टक्के रक्कम दंड म्हणून वाहतूक कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

१८.३.२ अन्नधान्य व्यपगत प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा/कारवाईचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक, शिधावाटप यांची राहील.

१८.३.३ उपरोक्त दोन्ही प्रकरणी कंत्राट कालावधी मध्ये ५ पेक्षा अधिक वेळा अन्नधान्य व्यपगत करणाऱ्या अकार्यक्षम वाहतूक कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याचा तपशीलवार प्रस्ताव योग्य त्या कारणमिमांसेसह जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी शासनास सादर करावा.

१८.३.४ मात्र, अशी कार्यवाही करीत असताना धान्य व्यपगत होण्यास परिच्छेद क्र.१३ मधील घटक जसे उचल आदेश (D.O) उशिरा देणे, बेसडेपोमध्ये रेक लागल्याने वा अन्य कारणाने अन्नधान्य वेळेवर न मिळणे, ऐनवेळी बेसडेपो बदलणे, गोदामात अपूरी जागा असणे, गोदामामध्ये धान्य वेळेवर उतरवून न घेणे, हमालीचा अडथळा, परमिटे वेळेवर वितरीत न करणे, इत्यादी कारणीभूत आहेत काय, हे काळजीपूर्वक तपासूनच पुढील दंडात्मक कार्यवाही/कारवाई करावी.

**(१९) घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/दरघट मंजूर करणे:-**

१९.१ निविदेव्दारे अन्नधान्य कंत्राटे निश्चित झाल्यानंतर मंजूर दरावर वाहतुक कंत्राटाच्या कालावधीत घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/घट देण्यात येईल. याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१९.२ घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/दरघट कंत्राट कालावधीत १ वर्षाच्या कालावधीनंतर प्रत्येक वर्षी परिगणित करावी.

१९.३ घाऊक किंमत निर्देशांकाबाबतची माहिती eaindustry.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर परिगणणेसाठी केवळ या अधिकृत संकेतस्थळावरील माहिती वापरण्यात यावी.

१९.४ कंत्राटाचा करारनामा ज्या महिन्यात करण्यात येईल त्या महिन्याचा सर्व वस्तुसाठीचा घाऊक किंमत निर्देशांक (Wholesale Price Index for All Commodities) आधार धरण्यात यावा.

१९.५ कंत्राट कालावधीच्या १३ व्या महिन्याचा घाऊक किंमत निर्देशांक (Wholesale Price Index for All Commodities) घेण्यात यावा.

१९.६ घाऊक किंमत निर्देशांकानुसार प्रमाणशीर दरवाढ/दरघट खालीलप्रमाणे परिगणित करण्यात यावी.

**दरवाढ / दरघट = $\frac{\text{१९.५ नुसार WPI - १९.४ नुसार WPI}}{\text{१९.४ नुसार WPI}}$ x १०० = क्ष टक्के**

१९.७ अशाप्रकारे वाहतूक कंत्राटदारास मंजूर दराच्या क्ष टक्के दरवाढ देण्यात यावी. म्हणजेच वाहतूक कंत्राटदारास आधारभूत दराने कंत्राट मंजूर झाले असल्यास त्यास १३ व्या महिन्यापासून करारनाम्यातील दर + क्ष टक्के इतकी दरवाढ लागू राहिल. प्राप्त होणारी क्ष टक्केवारी प्रति किमी प्रति क्विंटल दर रचनेमधील प्रत्येक टप्प्याकरिता लागू करून पुढील वर्षाकरिताचे दर परिगणीत करण्यात यावेत.

१९.८ WPI मध्ये घट झाली असल्यास उपरोक्त सुत्रानुसार परिगणना करून वजा टक्केवारी प्राप्त होईल. त्याप्रमाणात दरघट करण्यात यावी. सदर प्राप्त होणारी दरघट देखील क्ष टक्केवारी प्रति किमी प्रति क्विंटल दर रचनेमधील प्रत्येक टप्प्याकरिता लागू करून पुढील वर्षाकरिताचे दर परिगणीत करण्यात यावेत.

१९.९ त्यापुढील वर्षी देखील उपरोक्त कार्यपद्धती वापरून लागू असलेल्या दरावर दरवाढ/दरघट परिगणित करण्यात यावी.

१९.१० सदर परिगणनेनुसार कंत्राट कालावधीत वाहतूक कंत्राटदारास मंजूर दरावर दरवाढ/दरघट करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांचे राहतील.

१९.११ कंत्राटाचा कालावधी आणीबाणी व निकडीच्या प्रसंगी **५ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी** वाढवावा लागल्यास वरीलप्रमाणे वाढीव कालावधीसाठी दरवाढ/दरघट लागू राहिल.

**(२०) धान्याची अफरातफर/काळाबाजार करण्यास प्रतिबंध: -**

२०.१ करारनामा करतेवेळी कंत्राटदाराने सादर केलेल्या मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांच्या यादी व्यतिरिक्त कंत्राटदाराने वाहतुकीकरीता अतिरिक्त वाहने उपलब्ध करुन दिल्यास अशा वाहनांच्या नोंदणी क्रमांकासह यादीस जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक, शिधावाटप यांनी लेखी मान्यता द्यावी. अशा वाहनांव्यतिरिक्त अन्य वाहनांमध्ये वाहतूक प्रतिनिधींनी धान्य भरुन देऊ नये.

२०.२ भारतीय अन्न महामंडळाच्या बेसडेपोतून धान्य भरून निघाल्यानंतर वाहन किमान किती वेळात विहित शासकीय धान्य गोदामामध्ये किंवा शिधा वाटप दुकानामध्ये पोहचले पाहिजे याबाबतचे वेळापत्रक उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा कार्यालयाने विहित करून द्यावे, संयुक्तिक कारणाशिवाय वाहन इप्सित ठिकाणी पोहोचले नाही, तर सदर बाब तात्काळ वाहतूक कंत्राटदाराच्या निदर्शनास आणून द्यावी व त्याबाबतचा लेखी खुलासा वाहतूक कंत्राटदाराकडून घेण्यात यावा.

२०.३ मान्यताप्राप्त वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनामधून वाहतूक केल्यास सदरची धान्य वाहतूक अवैध मानण्यात येऊन, याकरिता जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधित वाहतूकदार जबाबदार असल्याचे निदर्शनास आल्यास, त्याचे वाहतूक कंत्राट रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी शासनास सादर करावा.

२०.४ लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गतच्या कोणत्याही अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंच्या वाहतुकीदरम्यान कंत्राटदाराकडून अफरातफर होणार नाही, याची जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी दक्षता घ्यावी. अफरातफरीबाबत वर्तमानपत्र, दूरचित्रवाणी तसेच इतर कोणत्याही सामाजिक माध्यमातून बातमी प्रसिध्द झाल्यास त्याबाबत तात्काळ दखल घेवून योग्य ती कार्यवाही/कारवाई करून त्याबाबतचा खुलासा वृत्तपत्राकडे पाठविण्यात यावा तसेच प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनासदेखील सादर करावा.

२०.५ वाहतूकीदरम्यान वाहतूक कंत्राटदाराचे प्रतिनिधी, चालक, वाहक इ. यांचेकडून होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अफरातफर/काळाबाजारास ते व्यक्तिशः जबाबदार असतील. त्यांची तशी जबाबदारी निश्चित झाल्यास अधिनियमानुसार त्यांच्यावर कार्यवाही/कारवाई करण्यात यावी व त्यांना कामावरुन काढून टाकणे वाहतूक कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

२०.६ बऱ्याच वेळी अन्नधान्य वाहतूक ट्रक उप नियंत्रक, शिधावाटप/जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी विहीत केलेल्या मार्गाव्यतिरिक्त उभे असल्यास किंवा विहीत मार्गाव्यतिरिक्त इतर मार्गावरून वाहतूक करत असल्याचे अथवा विहीत ठिकाणाऐवजी इतरत्र अन्नधान्य उतरवत असल्याचे, तसेच वाहतूक कंत्राटदार इतर गैरमार्गाने अपहार करत असल्याची निवेदने, दूरध्वनी कॉल्स विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांकडे येत असतात. अशा वेळी संबंधित घटनेस प्रत्यक्ष जबाबदार असलेल्यांविरूद्ध कारवाई न करता वाहतूक कंत्राट संस्थेशी संबंधित सरसकट सर्वांवर जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ मधील तरतूदीनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येते. सरसकट कारवाई प्रस्तावित केल्याने बऱ्याच वेळेस अन्नधान्य वाहतूकीवर परिणाम होतो व सार्वजनिक वितरण व्यवस्था कोलमडते. सबब, उपरोक्त विविध अफरातफरीच्या प्रकरणी विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी यांनी धान्याचा अपहार झाला असल्याची खात्री करून मगच जे प्रत्यक्षात जबाबदार असतील त्यांच्याविरोधात कारवाई प्रस्तावित करावी. तसेच वाहतूकदारावर गुन्हा नोंद करण्यापूर्वी/FIR दाखल करण्यापूर्वी शासनाची लेखी परवनागी घेण्यात यावी.

२०.७ अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंची अफरातफर/काळाबाजार प्रकरणी वाहतूक कंत्राटदार किंवा त्याचे प्रतिनिधी प्रत्यक्ष दोषी आढळल्यास,प्रत्यक्ष दोषींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येऊन अपहारीत धान्याची किंमत बाजारभावाच्या दुप्पट दराने वाहतुकदाराकडून वसूल करण्यात येईल. अशा घटनेची दुसऱ्यांदा पुनरावृत्ती झाल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येऊन बाजारभावाच्या तिप्पट दराने वसूली करण्यात येईल. कंत्राट कालावधीत तिसऱ्यांदा याची पुनरावृत्ती झाल्यास, संबंधित वाहतूकदारावर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदवून वाहतूक कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करणे अपरिहार्य असल्याबाबत जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांचे मत झाल्यास व या तिन्ही प्रकरणी कंत्राटदार जबाबदार असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्यास, सदर वाहतूक कंत्राट रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव तपशीलवार स्पष्टीकरणासह शासनास सादर करावा.

२०.८ अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचा अपहार/चोरी/काळाबाजार होणार नाही याकरीता, सर्व गोदामाच्या ठिकाणी गोदाम नियमावलीचे काटेकारपणे पालन होते किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी विशेष दक्षता घ्यावी.

**(२१) <u>आणीबाणी व निकडीच्या प्रसंगी वाहतूक: -</u>**

२१.१ वाहतूक कंत्राटाच्या निविदेस वर्तमानपत्रात/महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर विस्तृत प्रसिध्दी दिल्यानंतर देखील कंत्राट निश्चित करणे शक्य नसल्यास, वाहतूक कंत्राट रद्द झालेले असेल, वाहतूकदार अकार्यक्षम ठरला असेल किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे पर्यायी वाहतूक व्यवस्था करण्याची परिस्थिती निर्माण झाली असेल तर, वाहतूकीसाठी खालील क्रमवार पर्यायानुसार व्यवस्था करावी.

२१.२ लगतच्या जिल्ह्यातील/परिमंडळातील कार्यरत वाहतूक कंत्राटदार, ज्या जिल्ह्यामध्ये/परिमंडळामध्ये वाहतूक करावयाची आहे, त्या जिल्हा/परिमंडळातील कार्यरत दरावर काम करण्यास तयार असल्यास, त्यानुसार त्यांचे देकार घेऊन, तसा तपशीलवार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा.

२१.३ जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी दरपत्रके मागवून त्याद्वारे प्राप्त झालेल्या दरांचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा. मात्र या वाहतूकदारास शासन निर्णयातील अटी शर्ती लागू राहतील.

२१.४ जिल्हास्तरावरील समितीने विहित केलेल्या दराने वाहने अधिग्रहित करुन वाहतूकीचे काम करण्यात यावे.

२१.५ नियुक्त कंत्राटदार वाहतूकीचे काम करण्यास अकार्यक्षम ठरल्यास, अशा वेळी वरीलपैकी उपलब्ध पर्यायाने वाहतूकीची व्यवस्था करण्यात यावी. या पर्यायी वाहतुकीसाठी आलेल्या जादा खर्चाची वसूली अपयशी कंत्राटदाराकडून करण्यात यावी.

**(२२) <u>करारनाम्यातील तरतूदीसंदर्भात वाद विवाद व अपिल: -</u>**

२२.१ करारनाम्याच्या कालावधीत किंवा तद्नंतर करारनाम्यातील तरतूदीसंदर्भात तसेच दंड, वसूली इत्यादी संदर्भात जिल्हाधिकारी/नियंत्रक, शिधावाटप यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द, निर्णय दिल्याच्या दिनांकापासून ६० दिवसात कंत्राटदार संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे दाद मागू शकेल.

२२.२ विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, आदेश पारीत झालेल्या दिनांकापासून ६० दिवसात विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाविरुध्द कंत्राटदार शासनाकडे अपिल करु शकेल.

२२.३ अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय अंतिम राहील आणि तो दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील. कंत्राटदार करारनामा संपल्यानंतर जास्तीतजास्त ६ महिन्यात करारनाम्यातील तरतूदी संदर्भात दाद मागू शकेल.

२२.४ कंत्राटदाराने आपल्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या वैध मार्गांचा अवलंब केल्याशिवाय त्यांना न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**(२३)** संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार माहे मे, २०२१ मध्ये सर्व परिमंडळे व सर्व जिल्ह्यांमध्ये वाहतूकदार नियुक्तीकरीता निविदा प्रसिध्द करून निविदा राबविण्यात आल्या होत्या. तथापि, छ.संभाजीनगर, सिंधुदुर्ग, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, बीड, नांदेड, धाराशीव, लातूर, अमरावती, धुळे, नंदुरबार, परभणी व सांगली जिल्ह्यातील निविदा प्रक्रियेविरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल झाल्या होत्या.

तसेच इतरही कारणांमुळे विहीत वेळेत निविदा प्रक्रीया राबवून अंतीम झाल्या नाहीत. त्यामुळे, उपरोक्त जिल्ह्यातील निविदा अंतिम होवून करारनामे विलंबाने करण्यात आले आहेत. सबब, या शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व परिमंडळे व राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये निविदा प्रसिध्द करून वाहतूक व्यवस्था प्रस्थापित करणे एकसमानतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, या शासन निर्णयानुसार निविदा प्रक्रियेअंती करारनामा झाल्यानंतर उपरोक्त जिल्ह्यातील यापूर्वी केलेले करारनामे संपुष्टात येतील. नवीन करारनामे होईपर्यंत सध्याच्या करारनाम्यानुसार वाहतूकीचे कामकाज चालू राहील.

(२४) सदर शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहेत.

**(२५) <u>शासन निर्णयाची व्याप्ती व अंमलबजावणी:-</u>**

२५.१ हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर निघणाऱ्या वाहतूक कंत्राटाच्या व अन्नधान्य हाताळणूकीच्या सर्व निविदांकरीता लागू राहिल. निविदा प्रारूपातील अटी व शर्ती तसेच या शासन निर्णयातील अटी व शर्ती यांमधील तरतूदींचा अन्वयार्थ लावताना संदिग्धता निर्माण झाल्यास या शासन निर्णयातील अटी व शर्ती या अंतीम समजण्यात याव्यात.

२५.२ शिधावाटप दुकानदारांना पोहोच करावयाच्या सर्व अन्नधान्याच्या, साखरेच्या अन्य शिधा वस्तूंच्या बाबतीत या शासन निर्णयानुसार झालेल्या कंत्राटातील मंजूर दरांनुसार वाहतूक केली जाईल.

२५.३ कंत्राट दरानुसार वाहतुकीसाठी जो खर्च करण्यात येईल तोच खर्च अर्थसंकल्पासाठी ग्राह्य धरण्यात यावा.

२५.४ या शासन निर्णयातील किंवा निविदा प्रपत्रातील अटी व शर्ती बाबत तक्रार असल्यास, त्याबाबतची दाद मागण्याचे ठिकाण मा.उच्च न्यायालय, मुंबई हे राहील.

**(२६)** धान्य वाहतूक व हाताळणूकीचा करारनामा झाल्यानंतर, नियुक्त कंत्राटदाराचे नाव, मंजूर केलेले दर, करारनाम्याची/कार्यारंभ आदेशाची प्रत इत्यादी अनुषंगिक बाबींची माहिती, १५ दिवसात शासनास सादर करण्यात यावी.

**(२७)** मा.मंत्रीमंडळाच्या दि.१०.०२.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये मिळालेल्या मान्यतेनुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**(२८)** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०४२४१२५२५६७००६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH UMESHRAO GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=1D60828C41033AB1DA6D64EF17879745D578B334C05C1E8151EF933F134060BC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BC8833F9E213A7E4DFB9D2B071C9202EA52A04054E53B0C1BBF9E50C90A2CF5C, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2026.04.24 12:54:02 +05'30'

**(संतोष गायकवाड)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

३) मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४) मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
५) मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
६) मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव.
७) अपर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१२) सर्व उपायुक्त (पुरवठा).
१३) सर्व उपनियंत्रक, शिधावाटप.
१४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
१५) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
१६) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१७) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
१९) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
२०) महालेखापाल (लेखावअनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
२१) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखापरीक्षा मंडळ (द्वारा वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.)
२२) वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
२३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, उद्योग-४, कामगार-५, मंत्रालय, मुंबई.
२४) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२५) निवडनस्ती (नापु १६-अ).

(अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: शासन निर्णय क्र:कंत्राट १९२४/प्र.क्र.७५/ना.पु.१६-अ, दि.२४ एप्रिल, २०२६ सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-अ

## डिझेल दरवाढ निश्चित करण्याचे सूत्र

| अ.क्र. | बाब | परिगणना |
|---|---|---|
| (अ) | करारनामा करण्यात आल्याचा दिनांकास असलेले डिझेलचे दर. | रुपये------/प्रति लिटर |
| (ब) | डिझेलच्या दरात १०% पेक्षा अधिक वाढ झाल्याच्या दिनांकास डिझेलचे दर. | रुपये------/प्रति लिटर |
| (क) | वाहन धावण्याची सरासरी. | ३.५ कि.मी / प्रति लिटर |
| (ड) | करारनामा करण्याच्या दिनांकास १ कि.मी वाहन धावण्यासाठी आलेला डिझेलचा खर्च. | (अ) येथील डिझेल दर = रुपये---<br>३.५ |
| (इ) | डिझेलच्या दरात वाढ झाल्याच्या दिनांकास १ कि.मी वाहन धावण्यासाठी आलेला डिझेलचा खर्च. | (ब) येथील डिझेल दर = रुपये---<br>३.५ |
| (फ) | १ कि.मी.अंतर धावण्यासठी डिझेल खर्चात झालेली वाढ. | (इ) - (ड) = रुपये----- |
| (ग) | डिझेलच्या दरात वाढ झाल्याच्या दिनांकास धान्य वाहतूकीचे प्रत्यक्ष एकूण अंतर. | ------- कि.मी. |
| (ह) | डिझेल दरवाढीची एकूण देय रक्कम. | (फ) x (ग) = रुपये------ |

***************

## डिझेल दर कमी झाल्यास वसुली निश्चित करण्याचे सूत्र

| अ.क्र. | बाब | परिगणना |
|---|---|---|
| (अ) | करारनामा करण्यात आल्याचा दिनांकास असलेले डिझेलचे दर. | रुपये------/प्रति लिटर |
| (ब) | डिझेलच्या दरात १०% पेक्षा अधिक घट झाल्याच्या दिनांकास डिझेलचे दर. | रुपये------/प्रति लिटर |
| (क) | वाहन धावण्याची सरासरी. | ३.५ कि.मी / प्रति लिटर |
| (ड) | करारनामा करण्याच्या दिनांकास १ कि.मी वाहन धावण्यासाठी आलेला डिझेलचा खर्च. | (अ) येथील डिझेल दर = रुपये---<br>३.५ |
| (इ) | डिझेलच्या दरात घट झाल्याच्या दिनांकास १ कि.मी वाहन धावण्यासाठी आलेला डिझेलचा खर्च. | (ब) येथील डिझेल दर = रुपये---<br>३.५ |
| (फ) | १ कि.मी.अंतर धावण्यासठी डिझेल खर्चात झालेली वाढ. | (इ) - (ड) = रुपये----- |
| (ग) | डिझेलच्या दरात घट झाल्याच्या दिनांकास धान्य वाहतूकीचे प्रत्यक्ष एकूण अंतर. | ------- कि.मी. |
| (ह) | डिझेल दरवाढीची एकूण देय रक्कम. | (फ) x (ग) = रुपये------ |

***************